


दि बेरार जनरल एज्युकेशन सोसायटी, अकोला द्वारा संचालित

# श्री राधाकिसन लक्ष्मीनारायण तोष्णीवाल विज्ञान महाविद्यालय, अकोला

**नॅक 'अ' श्रेणी प्राप्त (सी.जी.पी.ए.-३.१२)**

(महाराष्ट्र शासन मान्यताप्राप्त व संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती संलग्नीत)

# प्रतिबिंब

२०२१-२२

## राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-२०२०

# THE BERAR GENERAL EDUCATION SOCIETY, AKOLA

## Executive Committee



**Adv. Motisingh G. Mohta**
President



**Shri Vijaykumar S. Toshniwal**
Sr. Vice President



**Dr. Ravindra C. Jain**
Jr. Vice President



**Shri Pavan N. Maheshwari**
Hon. Secretary



**Er. Abhijeet G. Paranjpe**
Jt. Secretary



**Adv. Pramod W. Agrawal**
Executive Member



**Ar. Atul R. Bang**
Executive Member



**Shri Abhay P. Bijwe**
Executive Member



**Shri Deepak B. Chandak**
Executive Member



**Shri Rameshchandra S. Chandak**
Executive Member



**Shri Karan K. Cheema**
Executive Member



**CA Vikram R. Golechha**
Executive Member



**Adv. Ajaykumar R. Gupta**
Executive Member



**Dr. Ajay V. Kant**
Executive Member



**Dr. Kiran H. Laddha**
Executive Member



**Dr. Satish L. Rathi**
Executive Member



**Shri Amit A. Sureka**
Executive Member

### Invitee Members



**Dr. R.D. Sikchi, Principal**
Sitabai Arts, Commerce & Science College, Akola



**Dr. V.R. Kodape, Off.Principal**
Shri K.N.G. Arts & Commerce College, Karanja



**Dr. S.G. Chapke, Principal**
Smt. L.R.T. College of Commerce, Akola



**Dr. V.D. Nanoty, Principal**
Shri R.L.T. College of Science, Akola



**Prof. G.V. Egaonkar, Off.Principal**
Shri Nathmal Goenka Law College, Akola



**Shri Ajay S. Kale, H.M.**
N.M. Chaudhari Vidhyalaya, Akola



**Sau. Ashwini Deshpande, H.M.**
J.C. Digital Eng. School, Akola



**Dr.Mrs. Jyoti H. Lahoti**
Teaching Staff Representative



**Shri Pankaj Agrawal**
Non-Teaching Staff Representative

# SHRI RADHAKISAN LAXMINARAYAN TOSHNIWAL COLLEGE OF SCIENCE, AKOLA

**VISION**

"To become one of the best educational institutions in the country, aspiring for national recognition of excellence through teaching, learning, research and extension in the field of science and technology."

**MISSION**

Shri Radhakisan Laxminarayan Toshniwal College of Science dedicates itself to the cause of science education and propagation of scientific temper among the students, it seeks to mould a student into a multifaceted person with a pragmatic mind and a humane out look capable of facing the challenges of the 21st century. Shri R.L.T. College expects every student entering its portal to be a disciplined, hardworking, well read member of the community ready to give his best to the country.

# प्रतिबिंब

२०२१ – २०२२

## संपादक मंडळ

- मराठी विभाग : कु. निकीता तायडे
- हिंदी विभाग : कु. मानसी बोरकर
- इंग्रजी विभाग : कु. कोमल कोरकने

## संयोजक मंडळ

श्री. मंगेश आर. उबाळे
प्रा.डॉ. प्रदीप पी. देवहाते
प्रा.डॉ. अर्चना एस. सावरकर
प्रा. अरूण बी. खेडकर


## श्री रा.ल.तो. विज्ञान महाविद्यालय, अकोला

Ph. : (0724) 2415480, 2415650
E-mail : principal@rltsc.org • www.rltsc.edu.in
Re-accredited ‘A’ Grade by NAAC, Banglore with CGPA 3.12

# अनुक्रमणिका


- Principal's Message — Dr. Vijay D. Nanoty
- संपादकीय — श्री. मंगेश आर. उबाळे


## मराठी/हिंदी विभाग


| | | | |
|---|---|---|---|
| 1) | नवीन शैक्षणिक धोरण व महत्वाची आव्हाने | कु. पुजा फोकमारे | 1 |
| 2) | फुल | कु. पुजा फोकमारे | 2 |
| 3) | नवीन शैक्षणिक धोरण व प्रमुख आव्हाने | कु. सेजल वानखेडे | 3 |
| 4) | राष्ट्रीय शैक्षणिक धोरण–२०२० : नवीन शैक्षणिक धोरण, उपलब्ध संधी व संसाधने | कु. चेतन काळे | 4 |
| 5) | नवे शैक्षणिक धोरण आणि आव्हाने | कु. प्रियंका वरठे | 5 |
| 6) | नवीन शैक्षणिक धोरण : एक व्यापक भूमिका | दिवेश मते | 7 |
| 7) | राष्ट्रीय शैक्षणिक धोरण–२०२० : एक नवी दिशा | कु. निकीता चव्हाण | 11 |
| 8) | खिडकी | शिवराज ठाकरे | 12 |
| 9) | राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० : एक आमुलाग्र बदल | कु. निकीता तायडे | 13 |
| 10) | एक सत्य | प्रा. उज्वला स. डांगे | 14 |
| 11) | नवीन शैक्षणिक धोरण : महत्त्वाचे पाऊल | कु. चैताली लांजुडकर | 15 |
| 12) | जगात काही सोपं नाही | कु. दर्शना कुळकर्णी | 18 |
| 13) | राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० : एक नवी पहाट | कु. वैष्णवी आगलावे | 19 |
| 14) | प्रवास | शिवराज ठाकरे | 26 |
| 15) | राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० : व्यक्तिमत्व विकासाची नांदी | कु. मृण्मयी गालफाडे | 27 |
| 16) | घर | शिवराज ठाकरे | 28 |
| 17) | शिक्षणाचे आंतरराष्ट्रीयीकरण | शिवराज ठाकरे | 29 |
| 18) | नॅशनल एज्युकेशन पॉलिसी अंतर्गत बहुविद्याशाखीय शिक्षण | यश सरप | 30 |
| 19) | तो थेंब पावसाचा | कु. जयश्री हाडोळे | 32 |
| 20) | राष्ट्रीय शैक्षणिक धोरण | कु. निकीता चव्हाण | 33 |
| 21) | विविधतेतुन एकता | शिवराज ठाकरे | 36 |
| 22) | जाणारे बाळा.... | कु. प्रगती कंकाळ | 36 |



**संयोजक** : श्री. मंगेश उबाळे • **प्रकाशक** : प्राचार्य डॉ.विजय नानोटी • **मुद्रक** : प्रकाश प्रिंटर्स, अकोला

| | | | |
|---|---|---|---|
| 23) | NEP 2020 अंतर्गत नवीन अभ्यासक्रम रचना | कु. निकीता राऊत | 37 |
| 24) | जा घेऊन .... | श्री. मंगेश उबाळे | 38 |
| 25) | भारताच्या नवीन शैक्षणिक धोरणाचे फायदे | कु. श्रीया अवचार | 39 |
| 26) | मैत्रीतील सारांश | शिवराज ठाकरे | 40 |
| 27) | राष्ट्रीय शिक्षा प्रणाली | कु. जान्हवी चौबे | 41 |
| 28) | मंजिल.... | प्रा. उज्वला स. डांगे | 41 |
| 29) | अपना छाता साथ रखना | डॉ. हरीष सु. मालपाणी | 42 |

## ENGLISH SECTION

| | | | |
|---|---|---|---|
| 30) | NEP-2020 Outlines the Vision of India's New Education System for Quality Higher Education | Dr. Pradip P. Deohate | 43 |
| 31) | Moon | Ms. Dipti R. Uke | 44 |
| 32) | Technology in Education under NEP-2020 | Mr. Shailesh R. Jaiswal | 45 |
| 33) | Life.... | Mr. Arun B. Khedkar | 45 |
| 34) | The "SWAYAM" MOOC Platform in India under CBCS NEP-2020 | Mr. Shailesh R. Jaiswal | 46 |
| 35) | Digitalization and Quality of Life in India in the New Education Policy 2020 | Mr. Shailesh R. Jaiswal | 48 |
| 36) | New Education Policy : Vision and Advantages/ Disadvantages | Ms. Komal Korkane | 49 |
| 37) | People | Mr. Arun B. Khedkar | 50 |
| 38) | Poem of Life | Mr. Mangesh R. Ubale | 50 |
| 39) | National Education Policy | Ms. Vaibhavi B. Tople | 51 |
| 40) | Teaching and Administrative Staff | | 53 |
| 41) | College Development Committee and School Committee | | 54 |




# Message From The Principal's Desk

I am extremely delighted to handover to you 'Pratibimb' issue of 2021-22, with the theme "NATIONAL EDUCATION POLICY 2020". 'Pratibimb' is the college magazine in the form of the creative output of students of Shri R.L.T. College of Science, Akola. The college has completed its 50 years of establishment recently and is marching ahead with the mission of propagation of scientific temperament among students and society. The college stands as one of the leading science colleges in Maharashtra with 'A' grade CGPA 3.12 in the third cycle of NAAC.

I would like to express my sincere thanks to the management for always supporting and guiding us every time. I am very much thankful to the teaching, administrative, non teaching staff and all the other stakeholders of the college for putting efforts for the upliftment of the college.

To sum up, I congratulate the students who have contributed to this beautiful issue of Pratibimb to exhibit their writing skill, creativity and innovative thoughts through their write ups. I also congratulate the entire editorial team for bringing out this issue of 'Pratibimb 2021-22'.

All the very best...!

**Dr. Vijay D. Nanoty**
Principal
Shri R.L.T. College of Science, Akola

# संपादकीय....



श्री. मंगेश आर. उबाळे

विद्यार्थी वर्गाच्या विकासामध्ये वार्षिकांकाची भूमिका महत्वाची आहे. महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या साहित्य लिखाण या गुणांचा विकास महाविद्यालयीन वार्षिकांक 'प्रतिबिंब' याद्वारे नेहमीच होत असतो. विद्यार्थ्यांच्या मनातील विचार व त्यांची मते व भावना याचे व्यासपिठ म्हणजे वार्षिकांक 'प्रतिबिंब २०२१-२२' होय.

या वर्षी महाविद्यालयातील वार्षिकांकाची संकल्पना 'नविन शिक्षण प्रणाली २०२०' ही आहे. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती मा. कुलगुरु यांच्या मार्गदर्शनाखाली या शिक्षणप्रणालीची सुरुवात विद्यापिठाच्या अंतर्गत असणाऱ्या सर्व महाविद्यालयात सुरुवात करण्यात आली आहे. त्याच्याच एक भाग म्हणून श्री रा.ल.तो. विज्ञान महाविद्यालय हे सुद्धा आहे व तोच धागा पकडून यावर्षी ही संकल्पना घेवून आम्ही आपल्या समोर विद्यार्थी, शिक्षक, शिक्षकेत्तर व शैक्षणिक कर्मचारी यांना या प्रणालीबद्दल असणारी माहिती या वार्षिकांकामध्ये मांडणार आहोत.



डॉ. प्रदीप पी. देवहाते

नव्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणातून सर्जनशिल विचार, चिकित्सक विचार, संभाषण कला, सहकार्य, सहवेदना आणि आत्मविश्वास या कौशल्यावर विशेषत्वाने लक्ष दिले जाणार आहे. शैक्षणिक धोरणान्वये शैक्षणिक व्यवस्था व संस्था याच्याकरिता मुलभूत तत्वे निश्चित करण्यात आलेली आहे. भारतीय मूल्य जोपासून अभ्यासक्रम व अभ्यापन शास्त्राच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये मुलभूत कर्तव्ये, संविधानिक मूल्ये तसेच देशाशी असलेले बंध तयार करणे हे या धोरणातून अपेक्षित आहे.



डॉ. अर्चना एस. सावरकर

विद्यार्थी वर्गाच्या विकासात महत्वपूर्ण भूमिका बजावणारे हे वार्षिकांक आहे. ही जवाबदारी दि बी.जी.ई. सोसायटीचे अध्यक्ष मा.ॲड. मोतीसिंहजी मोहता तसेच मानद् सचिव मा.श्री. पवनजी एन. माहेश्वरी तसेच संपूर्ण पदाधिकारी व कार्यकारिणी सदस्य आणि प्राचार्य मा.डॉ. विजय डी. नानोटी यांनी संयोजन मंडळावर सोपविली याबद्दल त्यांचे आम्ही अत्यंत आभारी आहोत. या अंकाची मांडणी करतांना संयोजन मंडळातील सर्व सहकारी डॉ. अर्चना सावरकर, डॉ. प्रदीप देवहाते, प्रा. अरूण खेडकर, तसेच संयोजन मंडळातील विद्यार्थी व सर्व प्राध्यापकांची व या वार्षिकांकामध्ये मोलाची भूमिका बजावणारे मे. प्रकाश प्रिंटर्स यांनी उत्कृष्ट छपाई कार्य केल्याबद्दल त्यांचे मन:पूर्वक धन्यवाद. महाविद्यालयातील प्रगतिचा आलेख आपल्यापर्यंत पोहोचवित आहोत.

धन्यवाद्.

श्री. मंगेश उबाळे
प्रमुख संयोजक



प्रा. अरूण बी. खेडकर



कु. निकीता तायडे



कु. मानसी बोरकर



कु. कोमल कोरकने

# MARATHI/HINDI SECTION

# नविन शैक्षणिक धोरण व महत्वाची आव्हाने

तब्बल ३४ वर्षानंतर आपल्या देशात नवीन शैक्षणिक धोरण २०२० साली जाहीर करण्यात आले आहे. इस्त्रोचे माजी प्रमुख के. कस्तुरीरंगन यांच्या अध्यक्षतेखाली समितीने या धोरणाचा मसुदा तयार केला आहे. या शैक्षणिक धोरणातील महत्त्वाच्या गोष्टी कोणत्या, येणाऱ्या काळात शिक्षण पद्धतीत कोणत्या अमुलाग्र बदल होणार आहे हे सांगितले आहे.

शैक्षणिक पद्धतीचा इतिहास सर्वात प्रथम पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या काळात १९६८ साली पहिले राष्ट्रीय धोरण जाहीर केले. त्यानंतर खुप वेगवेगळे बदल घडून आले. गेल्या वर्षीच्या जुलै महिन्यामध्ये भारताने २१व्या शतकातील पहिले व सर्वात व्यापक धोरण निर्माण केले. १९८६ नंतर पहिल्यांदाच असे शैक्षणिक धोरण जाहीर करण्यात आले.

हे नवीन शैक्षणिक धोरण जाहीर झाल्याच्या वर्षापूर्तीनिमित्त बोलतांना मा. पंतप्रधान नरेंद्रजी मोदी असे म्हणाले की, आपण स्वातंत्र्याच्या ७५ व्या वर्षामध्ये पदार्पण करत आहोत, एका प्रकारे नव्या शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी करणे हा आता अत्यंत महत्वाचा भाग बनला आहे. नवीन भारत व भविष्यासाठी तयार युवा पिढी घडवण्याच्या दृष्टीने हे धोरण महत्वाची भूमिका बजावणार आहे. या शिक्षण पद्धतीमुळे शालेय विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण केला. विद्यार्थ्यांची क्षमता विकास आणि शिक्षणाच्या माध्यमांमध्ये परिवर्तन घडून येणार आहे.

कोरोना महामारीचा सामना करत या नवीन शिक्षण पद्धतीची स्थापना झाली. या पद्धतीचे महत्वाचे धोरण म्हणजे विविध भागांमध्ये जारूकता हितसंबंध निर्माण करणे. नवीन शैक्षणिक धोरण २०२० अंतर्गत शालेय व उच्च शालेय शिक्षणाच्या रचनेत अमुलाग्र बदल करण्यात आला आहे. शिक्षण अभ्यासक्रमामध्ये वेगवेगळ्या शाखांच्या चौकटीतून बाहेर काढून आंतरशाखीय आणि समन्वयी करण्यात आले आहे. याचाच सोपा अर्थ असा आहे की आता एकाच वेळी अभियांत्रिकी व संगीत हे दोन्ही विषय घेऊनही उच्चशिक्षण घेता येईल.

या धोणातील तरतूदीनुसार ३ ते १४ वर्ष वयोगटाचे विद्यार्थी शिक्षण हक्क कायद्याच्या कक्षेत आले आहे. यापूर्वी हा वयोगट ६ ते १४ होता. या उपक्रमाद्वारे उच्च शिक्षणातील अनेक पर्याय विद्यार्थ्यांसाठी खुले होऊ शकतील. याशिवाय इयत्ता ३ पर्यंतचे विद्यार्थ्यांचे वाचन, लेखन, आणि संख्याशास्त्र शिकण्याची क्षमता सुधारण्यासाठी 'निपुण भारत मिशन', पहिलीला प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या तयारीसाठी तीन महिन्यांचा अभ्यासक्रम 'विद्या प्रवेश', शिक्षण अध्यायनासाठीचे 'दीक्षा' हे ॲप आणि माध्यमिक स्तरावरील शिक्षकांसाठी 'निष्ठा' हा शिक्षक प्रशिक्षण कार्यक्रम असे अनेक उपक्रम सरकारकडून आणण्यात आले आहे.

**पाच महत्त्वाची आव्हाने**

भारताच्या शैक्षणिक क्षेत्रातील विविधता आणि आकार लक्षात घेता या धोरणाची अंमलबजावणी हे एक अवघड काम असणार आहे. उदाहरणासाठी आपण शालेय शिक्षण व्यवस्थेचा विचार करू. १५ लाखाहून अधिक शाळा, २५ करोड विद्यार्थी आणि ८९ लाख शिक्षकांसह भारतातील शिक्षण व्यवस्था ही जगातील दुसऱ्या क्रमांकावरील शिक्षण व्यवस्था आहे.

उच्च शिक्षण व्यवस्थेचा आकारही फार मोठा आहे. एकूण संस्थामिळून ३.७४ करोड विद्यार्थी शिक्षण घेत आहेत.

दुसरी महत्वाची गोष्ट म्हणजे नव्या शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी देशांच्या, राज्यांच्या आणि सरकारांच्या क्षमतेवर अवलंबून आहे. नव्या शैक्षणिक धोरणामध्ये कल्पना केलेल्या परिवर्तनाच्या विशालतेला चालना देण्यासाठी शिक्षण मंत्रालये आणि

इतर नियामक संस्थामधील अंतर्गत क्षमता अत्यंत अपूरी आहे. पारंपारिक शिक्षणाकडून प्रयोगात्मक शिक्षण व टिकात्मक विचारापर्यंत जाण्यासाठी ही शिक्षण व्यवस्था चालणाऱ्या लोकांच्या व सोबतच शिक्षक, विद्यार्थी व पालकांच्या दृष्टीकोनात बदल होणे गरजेचे आहे.

तिसरी महत्वाची गोष्ट म्हणजे हे धोरण मुख्यत्वे केंद्र आणि राज्यांमधील सहकार्यावर अवलंबून असणार आहे. अगदी स्पष्टपणे सांगायच झालं तर विविध उपक्रमांच्या अंमलबजावणीसाठी केंद्राला विकेंद्रीकरण आणि केंद्र–राज्ये यांच्यातील सहकार्य यांचा आधार घ्यावा लागणार आहे. गेल्या काही वर्षांमध्ये केंद्र व राज्ये यांच्यातील संघर्ष पाहता केंद्राला काळजीपूर्वक पावले उचलावी लागणार आहेत. नव्या शैक्षणिक धोरणातील अनेक तरतूदींवर विरोधी पक्षांचे सरकार असलेले अनेक राज्यांनी आक्षेप नोंदवले आहेत.

चौथी महत्त्वाची बाब म्हणजे या धोरणाच्या दृष्टीने खाजगी क्षेत्राची भूमिका महत्वाची ठरणार आहे. आपल्या भारतामध्ये जवळपास ७० टक्के उच्च शिक्षण देणाऱ्या संस्था खाजगी आहेत. या धोरणाच्या प्रक्रियेसाठी खाजगी क्षेत्राचे योगदान मिळवणे व यातील एक महत्वाचा भागीदार म्हणून खाजगी क्षेत्राच्या योगादानाला मान्यता देणे ही महत्वाची बाब आहे.

पाचवी महत्वाची बाब म्हणजे विविध उपक्रमांच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी येत्या दशकात परेल अशा संसाधनाची गरज लागणार आहे. नवे शैक्षणिक हा नक्कीच एक मार्गदर्शक दस्तऐवज आहे.

थोडक्यात सांगायचे म्हटले तर नव्या शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीचे यश सहकारी संघराज्य प्रणाली व सुधारणांमध्ये योगदान देण्याची राज्यांची क्षमता यावर अवलंबून आहे.

**कु. पुजा फोकमारे**
बी.एस्सी. भाग–१

# फुल

*फुला फुला तू किती छान,*
*तुला पाहताच मी विसरली भान ॥*

*तुला किती आहेत रे रंगीबिरंगी रंग,*
*त्यावर मधमाशा करतात भंगभंग ॥*

*तु फुल आहेस की आहेस चमत्कार,*
*सर्वांच्या जीवनात पसरवतोस निरागस सुवास ॥*

*तुला किती आहेत रेवेगवेगळे रंगीबिरंगी परागकण,*
*तुझी सुंदरता पाहल्यावर सर्वांचे हरवते मन ॥*

**कु. पुजा फोकमारे**
बी.एस्सी. भाग–१

# नवीन शैक्षणिक धोरण व प्रमुख आव्हाने

येणारी पिढी आत्मनिर्भर भारतासाठी, नवनिर्माणासाठी सज्ज होण्याच्या दिशेने टाकलेले एक पाऊल म्हणजे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० होय. १९८६ नंतर म्हणजेच तब्बल ३४ वर्षानंतर भारतीय शिक्षण धोरणात बदल करण्यात आले आहेत. जुन्या शैक्षणिक धोरणातील अनेक मुद्दे गेल्या ३४ वर्षात पुर्ण न होऊ शकल्याने त्याचे पुनरावलोकन करून ज्या बाबी अपुर्ण आहेत, त्यात काही सुधारणा करण्याची संधी आहेत, याकडे लक्ष देण्यात आले आहे.

महिलांच्या शिक्षणासाठी विशेष प्रयत्न, पुर्व प्राथमिक शिक्षणाकडे विशेष लक्ष, व्यवसायीक शिक्षणाकडे विशेष लक्ष हे या नवीन शैक्षणिक धोरणाचे काही प्रमुख मुद्दे आहेत.

**नवीन शैक्षणिक धोरणाबाबत प्रमुख आव्हाने :–**

१) देशात किमान शिक्षणाचा टक्का वाढत असला तरीपण गुणवत्तेच्याबाबत प्रश्नचिन्ह आहे. देशात सुमारे ४०००० कॉलेज आहेत तरी पण विद्यार्थी नांव नोंदणीमध्ये प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षणाच्या तुलनेत उच्च शिक्षणाचे प्रमाण २०१८ मध्ये फक्त २६.३% एवढे होते. आता तेच नविन शैक्षणिक धोणात २०३५ पर्यंत तोच आकडा ५०% एवढा न्यायचा आहे. आता यामध्ये शिक्षणाची गुणवत्ता कायम ठेवून हा आकडा वाढवणे हे फार मोठे आव्हान असु शकते.

२) गेल्या ३४ वर्षापासुन म्हणजेच १९८६ पासुन आपल्याला १०+२ अशा धोरणाची सवय झालेली आहे. म्हणजे गल्ली पासुन ते दिल्लीपर्यंत कोणी सुद्धा सांगु शकेल जुने शैक्षणिक धोरण. पण आता अचानक झालेले बदल सर्वांना पचनी पडायला पुरेसा वेळ लागणार आहे. कारण नविन शैक्षणिक धोरणाचे ५+३+३+४ हे सुत्र आपल्या अंगिकारायचे आहे. साहाजिकच हे धोरण १०वी आणि १२ वी बोर्डाचे महत्व कमी करणारे आहे. परंतु १० वी आणि १२ वीचे शिक्षण हे शालेय शिक्षण अंगीभुत शिक्षण म्हणुन कौशल्य विकसित करण्याच्या दृष्टिकोनातुन या धोरणामुळे शक्य होणार आहे.

३) १९६६ मध्ये कोठारी आयोगाने शिक्षणावर एकुण राष्ट्रिय उत्पन्नाच्या ६०% टक्के ऐवढा खर्च व्हावा अशी शिफारस केली होती. परंतु अद्याप त्याची अंमलबजावणी झालेली नाही आहे, मग ते मागील एवढ्या वर्षापासुन शक्य नाही झाले ते आता सरकार कसे करू शकेल ? हे सुद्धा एक आव्हान आहे.

४) मल्टीडिसीप्लिनरी अभ्यासक्रम :– एकाच वेळी वेगवेगळे विषय एकत्रितपणे शिकता येणार आहेत. यात मेजर आणि मायनर असे विभाजन असेन. मग अशा वेळेस जर विद्यार्थी एका वेळेस दोन वेगळ्यावेगळ्या विषयांचा अभ्यास होत असेल तर त्याला कोणताही मानसिक त्रास न होता तो कसा हे करू शकेल हे सुद्धा एक आव्हान आहे.

**कु. सेजल वानखेडे**
एम.एस्सी. भाग–१

# राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०
# नवीन शैक्षणिक धोरण, उपलब्ध संधी व संसाधने

नवीन शैक्षणिक धोरण, भारतातील शिक्षणाच्या इतिहासातील सर्वात मोठा बदल आहे. मानव संसाधन व्यवस्थापन मंत्रालयाने नवीन शैक्षणिक धोरण आणले आहे.

**नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण काय आहे ?**

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणांतर्गत, शाळा आणि महाविद्यालयांमधील शिक्षणाचे धोरण तयार केले जाते आणि याकरीता भारत सरकारने नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२१ तयार केले आहे. नवीन शैक्षणिक धोरणात बदल करण्याचा उद्देश म्हणजे जागतिक नजरेत भारताला महासत्ता बनवणे.

२०३० पर्यंत शालेय शिक्षणात १००% सह प्री-स्कूल ते माध्यमिक शाळेपर्यंत शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण केले जाईल. नवीन शैक्षणिक धोरणापुर्वी (१०+२) हा पॅटर्न पाळला जायचा. पण हे नवीन शैक्षणिक धोरण आल्याने (५+३+३+४) चा पॅटर्न पाळला जाईल.

**उपलब्ध संधी :**

जे संशोधनासाठी उच्च शिक्षण घेऊ इच्छितात त्या विद्यार्थ्यांसाठी चार वर्षांचा पदवी अभ्याक्रम तर जे विद्यार्थी पदवीनंतर नोकरी करू इच्छीतात त्यांच्यासाठी तीन वर्षांचा पदवी अभ्यासक्रम असेल.

* विद्यार्थ्यांना यापुढे एम.फिल. करावे लागणार नाही. म्हणजेच रिसर्च करणाऱ्यांसाठी पदवी अधिक एक वर्षाचा मास्टर्स अभ्यासक्रम अशी चार वर्षांची पदवी असेल. यानंतर ते थेट पीएच.डी. करू शकतील.
* नवीन शिक्षण पद्धतीनुसार जर विद्यार्थी एका कोर्स सोबत दुसरा कोर्स देखील करू शकतो. त्याचप्रमाणे दुसरीकडे नवीन शिक्षण धोरणांतर्गत जर एखाद्या विद्यार्थ्याला कोर्सच्या मध्ये दुसरा कोर्स करायचा असेल ता तो मर्यादित कालावधीसाठी पहिल्या कोर्समधुन ब्रेक घेऊन दुसरा कोर्स करू शकतो.
* उच्च शिक्षणातही अनेक सुधारणा केल्या आहेत. ज्यामध्ये श्रेणीबद्ध शैक्षणिक, प्रशासकीय, आणि आर्थिक स्वायत्तता समाविष्ट आहे. त्या शिवाय इतर कोर्सेस प्रादेशिक भाषांमध्येही सुरू केले जातील.
* मल्टीडिसिप्लिनरी अभ्यासक्रम : एकाच वेळी वेगवेगळे विषय एकत्रितपणे शिकता येणार आहेत. यात मेजर आणि मायनर असे विषयांचे विभाजन असेल. आर्थिक किंवा अन्य कारणांमुळे होणारे ड्रॉपआऊट यामुळे कमी होतील. शिवाय ज्यांना एखादा विषय आवडीचा वाटतो तो विषय त्यांना शिकता येईल.
* बहुभाषिक शिक्षण : मुलांना शिकवतांना एकाच भाषेच्या माध्यमातुन अध्यापन न करता विविध प्रादेशिक भाषांचा वापर करता येणार.
* लॉ आणि मेडिकल शिक्षण वगळता उच्च शिक्षण एका छताखाली येणार.
* विद्यार्थ्यांचे प्रगती पुस्तक बदलणार, शिक्षकांसोबतच विद्यार्थी देखील स्वत:चे मुल्यांकन करणार.
* सर्व महाविद्यालयांसाठी एकाच सामायिक प्रवेश परीक्षा, एटीए ही परीक्षा घेणार. मात्र ही परीक्षा ऐच्छिक असेल.

**चेतन काळे**

एम.एस्सी. भाग-१ (भौतिकशास्त्र)

# नवे शैक्षणिक धोरण आणि आव्हाने

नव्या शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीचे यश सहकारी संघराज्य प्रणाली व सुधारणांमध्ये योगदान देण्याची राज्यांची क्षमता यावर अवलंबून आहे.

नुकतेच भारताने २१ व्या शतकातील पहिले व सर्वात व्यापक शैक्षणिक धोरण जाहीर केले. १९८६ नंतर पहिल्यांदाच असे शैक्षणिक धोरण जाहीर करण्यात आले. या धोरणामध्ये भारताच्या शिक्षण व्यवस्थेला भेडसावणाऱ्या विविध आव्हानांवर उपाय सुचवण्याचा प्रयत्न करण्यात आला.

हे नवे शैक्षणिक धोरण झाल्याच्या वर्षपूर्तीनिमित्त बोलतांना पंतप्रधान मोदी असे म्हणाले की आपण स्वातंत्र्याच्या ७५ व्या वर्षामध्ये पदार्पण करत आहोत, एका प्रकारे नव्या शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी करणे हा आता अत्यंत महत्वाचा भाग बनला आहे, नवीन भारत आणि भविष्यासाठी तयार युवा पिढी घडवण्याच्या दृष्टीने हे धोरण महत्वाची भूमिका बजावणार आहे.

हे २१ शतकातील सर्वात दूरदर्शी धोरण आहे असे मत शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी मांडले आहे.

या धोरणामुळे शिक्षण सर्वसमावेशक, किफायतशीर, परवडण्याजोगे आणि न्याय्य होण्यास मदत होईल यावरही प्रधान यांनी भर दिला आहे. आतापर्यंत या क्षेत्रात कशी प्रगती झाली आहे ? हे धोरण खरेच प्रगतीपथावर आहे का ? येत्या काही दशकांमध्ये या धोरणासमोरील आव्हाने कोणती असणार आहेत ? याचा मागोवा या लेखात घेतला आहे.

हे धोरण जाहीर झाल्यापासून गेल्या काही कालावधीमध्ये कोरोना महामारीचा सामना करत या धोरणामधील काही महत्वाचे टप्पे पूर्ण करण्यात आले आहेत. सर्वात महत्वाचा म्हणजे नव्या शैक्षणिक धोरणातील ध्येये आणि दृष्टीकोन याबाबत विविध भागधारकांमध्ये जागरूकता आणि हितसंबंध निर्माण करण्याच्या दृष्टीने सरकारने चांगली कामगिरी बजावली आहे.

पंतप्रधान आणि इतर प्रमुख अधिकाऱ्यांची उपस्थिती असलेल्या दहा दिवसीय शिक्षक पर्वातून ही बाब प्रकर्षाने दिसून आली. याही पुढे जाऊन सरकारने मनुष्यबळ विकास मंत्रालयाचे नाव बदलून शिक्षण मंत्रालय असे केले आहे. उर्जा मंत्रालयात मोठे परिवर्तन घडून आणणाऱ्या धर्मेंद्र प्रधान यांना शिक्षक मंत्रालयात आणल्यामुळे या मंत्रालयात एक वेगळीच ऊर्जा प्राप्त झाली आहे.

या उपक्रमांची अंमलबजावणी सत्ताधारी पक्षांची ज्या राज्यात सत्ता आहे अशा मूठभर राज्यातच करण्यात आली आहे. २४ ऑगस्टला नव्या शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी करणारे कर्नाटक हे पहिले राज्य ठरले आहे. अलिकडेच नव्या शैक्षणिक धोरणातील काही उपक्रमांची अंमलबजावणी मध्यप्रदेश आणि हिमाचल प्रदेश या राज्यांनी करून या मेगा पॉलिसीच्या अंमलबजावणीला हातभार लावलेला आहे. आता खऱ्या अर्थाने नव्या शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीने जोर धरला आहे असे म्हणता येईल.

**पाच महत्वाची आव्हाने**

सध्या नव्या शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीने जोर धरलेला असला तरीही ते पुर्णत्वाला जाण्याच्या मार्गावर अनंत आव्हाने आहेत. भारताच्या शैक्षणिक क्षेत्रातील विविधता आणि आकार लक्षात घेता या धोरणाची अंमलबजावणी एक अवघड काम

असणार आहे. उदाहरणासाठी आपण शालेय शिक्षण व्यवस्थेचा विचार करू. १५ लाखाहून अधिक शाळा, २५ करोड विद्यार्थी आणि ८३ लाख शिक्षकांसह भारतातील शिक्षण व्यवस्था ही जगातील दुसऱ्या क्रमांकावरील शिक्षण व्यवस्था आहे.

उच्च शिक्षण व्यवस्थेचा आकारही फार मोठा आहे. एआयएसएचई २०१३ च्या अहवालानुसार भारताच्या उच्च शिक्षण क्षेत्रात जवळपास १००० विद्यापीठे, ३९,९३१ महाविद्यालये आणि १०,७२५ स्वायत्त संस्थांमध्ये मिळून ३.७४ करोड विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. राज्य, जिल्हा तसेच तालुका स्तरावरील सर्व भागधारकांना एकत्र आणून या नव्या शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी करणे ही एक अत्यंत कठीण बाब ठरणार आहे.

दुसरी महत्वाची गोष्ट म्हणजे नव्या शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी देशाच्या, राज्यांच्या आणि सरकारांच्या क्षमतेवर अवलंबून आहे.

तिसरी महत्वाची गोष्ट म्हणजे हे धोरण मुख्यत्वे केंद्र आणि राज्यांमधील सहकार्यावर अवलंबून असणार आहे. या धोरणाचा मसुदा केंद्र सरकारने राज्य सरकारांसह विविध भागधारकांच्या योगदानातून तयार केला असला तरी त्याची अंमलबजावणी मुख्यत्वे राज्यांच्या सक्रिय सहकार्यावर अवलंबून आहे. याचे मुख्य कारण म्हणजे बहुतांश सेवांवर आधारित शैक्षणिक उपक्रम राज्य सरकारांकडून चालवले जातात.

चौथी महत्वाची बाब म्हणजे या धोरणाच्या दृष्टीने खाजगी क्षेत्राची भूमिका महत्वाची ठरवणार आहे. भारतातील जवळपास ७० टक्के उच्च शिक्षण देणाऱ्या संस्था या खाजगी आहेत. तसेच एकूण संख्येच्या जवळपास ६० ते ७० टक्के उच्च शिक्षण देणाऱ्या संस्था या खाजगी आहेत. या धोरणाच्या प्रक्रियेसाठी खाजगी क्षेत्राचे योगदान मिळवणे व यातील एक महत्वाचा भागीदार म्हणून खाजगी क्षेत्राच्या योगदानाला मान्यता देणे ही एक महत्वाची बाब आहे.

कोरोना आणि आर्थिक संकटामुळे सरकारने आरोग्य क्षेत्रात अधिक खर्च करणे पसंत केले, त्यामुळे शिक्षण क्षेत्रावरील खर्चात कपात झाली याबाबत कोणतेही दुमत नाही. पण येत्या काळात शिक्षणावरील खर्च कसा वाढवता येईल यासाठी कोणतीही योजना सरकारकडे नाही.

राज्य, जिल्हा, तालुका पातळीवरील विविध भागधारकांना तसेच खाजगी क्षेत्राला या धोरणाच्या अंमलबजावणीमध्ये सहभागी करून घेणे हे एक अवघड काम आहे. सोबतच क्षमता, आर्थिक संसाधने तसेच नवीन कल्पना निर्मितीसाठीच्या अनुकूल वातावरणाची कमतरता ही आव्हानेही समोर आहेत. परंतु या सर्वांमध्ये विविध राज्यांमध्ये जनमत तयार करणे हे सर्वात कठीण काम आहे. थोडक्यात सांगायचे तर नव्या शैक्षणिक धोरणांच्या अंमलबजावणीचे यश सहकारी संघराज्य प्रणाली व सुधारणांमध्ये योगदान देण्याची राज्यांची क्षमता यांवर अवलंबून आहे.

**कु. प्रियंका वरठे**
बी.एस्सी. भाग–२

# नवीन शैक्षणिक धोरण : एक व्यापक भूमिका

१९८६ नंतर जवळपास ३४ वर्षांनी देशाचं 'नवं राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२०' हे इस्त्रोचे माजी संचालक व विख्यात अंतराळ शास्त्रज्ञ के. कस्तुरीरंगन यांच्या अध्यक्षतेखालील एक तज्ज्ञ समितीने तीन वर्ष परिश्रम करून, तसेच शैक्षणिक क्षेत्रातील सर्व संबंधितांशी व्यापक विचारविनिमय आणि सल्ला–मसलत करून तयार केले आहे. १९६८ व १९८६ च्या राष्ट्रीय शिक्षण धोरणामधील चांगल्या मुलभूत बाबी कायम ठेवून एकविसाव्या शतकाच्या भारतासाठी, कस्तुरंगन यांच्या भाषेत सागायचं तर ते Fine tuning नव्हतं, तर complete over hanling होतं. कारण इंटरनेट व माहिती तंत्रज्ञानाचं युग १९९० नंतर खऱ्या अर्थाने सुरू झाले होते आणि आता जग चौथ्या औद्योगिक क्रांतिपर्वात पुढे चालले आहे. अशा वेळी नव्या युगासाठी, तंत्रज्ञानाधिष्ठित जागतिक बदलांना देशाला सज्ज करण्यासाठी आणि त्याच वेळी भारताची सामाजिक–आर्थिक परिस्थिती पाहता व भारतीय संविधानिक मूल्ये लक्षात घेऊन 'नवे राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२०' ला केंद्राने मंजुरी दिली.

नव्या शैक्षणिक धोरणानुसार शालेय अभ्यासक्रमात कृत्रिम बुद्धिमत्ता आणि आर्थिक बाबींचा समावेश करण्यात आला आहे. नव्या आर्थिक धोरणामध्ये मातृभाषा किंवा प्रादेशिक भाषेला अधिक प्राधान्य देण्यात आले आहे. काही राज्यांमध्ये प्रायोगिक तत्वावर हा उपक्रम सुरू करण्यात आला आहे. तसेच शिक्षण मंत्रालयाने बहुचर्चित 'अकॅडेमिक बँक ऑफ क्रेडिट' हा उपक्रम आणला आहे.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणांतर्गत शाळा आणि महाविद्यालयांमधील शिक्षणाचे धोरण तयार केले जाते आणि भारत सरकारने नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२२ लाँच केले आहे. नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात (NEP) सरकारने अनेक महत्वाचे बदल केले आहेत. नवीन शैक्षणिक धोरणात बदल करण्याचे मुख्य कारण म्हणजे जागतिक नजरेत भारताला महासत्ता बनवणे.

भारताच्या नवीन शैक्षणिक धोरणांतर्गत, २०३० पर्यंत शालेय शिक्षणात १००% GIR सह प्री–स्कूल ते माध्यामिक शाळेपर्यंत शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण केले जाईल (वैद्यकीय आणि कायद्याचा अभ्यास समाविष्ट नाही).

**नवीन शैक्षणिक धोरणाचे ४ टप्पे पुढीलप्रमाणे आहेत :**

१. **पहिला पायाचा टप्पा** :– ३ ते ८ वर्षे वयोगटातील मुलांना फाऊंडेशन स्टेजमध्ये समाविष्ट करण्यात आले आहे. या टप्प्यात त्यांच्या शालेय शिक्षणाची ३ वर्षे आणि २ वर्षे पूर्ण शालेय शिक्षण ज्यामध्ये इयत्ता १ आणि २ समाविष्ट आहे. फाऊंडेशन स्टेजमध्ये विद्यार्थ्यांना शिकवले जाईल आणि भाषा कौशल्ये आणि अध्यापनाच्या विकासावर लक्ष केंद्रित केले जाईल.

२. **तयारीचा टप्पा** :– तयारीच्या टप्प्यांतर्गत, ८ ते ११ वर्षे वयोगटातील मुलांचा समावेश करण्यात आला आहे. पूर्वतयारीच्या टप्प्यांतर्गत, इयत्ता ३ ते इयत्ता पाचवीपर्यंतच्या मुलांचा समावेश केला जाईल आणि या टप्प्यात शिक्षकांची भाषा आणि संख्यात्मक कौशल्ये विकसित होतील. मुले उद्देश असेल पूर्व तयारीच्या टप्प्यापर्यंत मुलांना प्रादेशिक भाषेत शिकवले जाईल.

३. **मधला टप्पा** :– मध्यम टप्पा अंतर्गत इयत्ता ६ वी ते इयत्ता ८ वी च्या मुलांना सहभागी करून घेतले जाईल. मधल्या टप्प्यात इयत्ता ६ वी च्या मुलांना कोडिंग शिकवले जाईल तसेच त्यांना व्यावसायिक प्रशिक्षण आणि इंटर्नशिप दिली जाईल.

४. **माध्यमिक टप्पा** :– इयत्ता ९ वी ते १२ वी पर्यंतच्या मुलांचा समावेश माध्यमिक टप्प्यांतर्गत करण्यात आला आहे. कारण मुले पूर्वी विज्ञान, वाणिज्य आणि कला विषय घेत असत. ही सुविधा रद्द करण्यात आली आहे. माध्यमिक टप्प्यांतर्गत यामुळे मुले

त्यांच्या आवडीचा विषय घेऊ शकतील आणि पुढील अभ्यास करू शकतील. उदाहरणासह समजून घ्या. मुलाला विज्ञानासह कॉमर्स किंवा कॉमर्ससह आर्टस्चा अभ्यास करायचा असेल, तर त्यालाही परवानगी दिली जाईल.

**राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० ची वैशिष्ट्ये :**

- भारताच्या नवीन शैक्षणिक धोरणाच्या आगमनाने, मनुष्यबळ व्यवस्थापन मंत्रालय आता शिक्षण मंत्रालय म्हणून ओळखले जाईल.
- नवीन शैक्षणिक धोरण २०२२ अंतर्गत शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण केले जाईल, ज्यामध्ये वैद्यकीय आणि कायद्याच्या अभ्यासाचा समावेश करण्यात आलेला नाही.
- भारतात पूर्वीच्या शैक्षणिक धोरणांतर्गत १०+२ पॅटर्न पाळला जात होता. मात्र आता या नवीन शैक्षणिक धोरणांतर्गत ५+३+३+४ पॅटर्नचा अवलंब केला जाईल. ज्या अंतर्गत १२ वर्षांचे शालेय शिक्षणही दिले जाईल.
- ३ वर्षांच्या पूर्व शालेय शिक्षणाचाही समावेश करण्यात आला आहे. भारताच्या नवीन शैक्षणिक धोरणांतर्गत सहाव्या इयत्तेत विद्यार्थ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे कारण व्यावसायिक प्रशिक्षण, इंटर्नशिपही सहाव्या इयत्तेपासून सुरु होणार आहे.
- इयत्ता पाचवीपर्यंत मातृभाषेतून किंवा प्रादेशिक भाषेत शिक्षण दिले जाईल म्हणजे पाचवीपर्यंत विद्यार्थ्यांना त्यांच्या भाषेतच शिक्षण घेता येईल.
- पूर्वी जसे विज्ञान, कला आणि वाणिज्य शाखेचे प्रवाह असायचे, त्या अंतर्गत विद्यार्थ्यांना ठराविक विषयाचा अभ्यास करायचा होता पण आता ही पद्धत रद्द करण्यात आली आहे.
- उदाहरणाद्वारे समजून घेऊया, एखाद्या विद्यार्थ्याने भौतिकशास्त्राची निवड केली, तर नवीन शैक्षणिक धोरणानुसार तो खाते किंवा कला या विषयाचाही अभ्यास करू शकतो.
- सहाव्या इयत्तेपासून विद्यार्थ्यांना कॉम्प्युटर आणि ॲप्लिकेशनची माहिती दिली जाईल. तसेच त्यांना कोडिंग शिकवले जाईल.
- सर्व शाळा डिजिटल केल्या जातील. सर्व प्रकारच्या सामग्रीचे प्रादेशिक भाषेत देखील भाषांतर केले जाईल.
- नवीन शैक्षणिक धोरण २०२२ अंतर्गत व्हर्च्युअल लॅब देखील विकसित केल्या.

**भारताच्या नवीन शैक्षणिक धोरणाचे फायदे :**

१. हे नवीन शैक्षणिक धोरण भारतात लागू करण्याचा सर्वात मोठा उद्देश भारतातील विद्यार्थ्यांना सक्षम करणे हा आहे.

२. नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२२ ची अंमलबजावणी करण्यासाठी, केंद्र सरकार जीडीपी च्या ६% खर्च करेल.

३. संस्कृत आणि भारतातील प्राचीन भाषेला अभ्यासात महत्त्वाची भूमिका दिली जाईल, संस्कृतला आयआयटीच्या क्षेत्रातही पुढे नेले जाईल, तसेच ज्या विद्यार्थ्यांना हवे असेल ते संस्कृत भाषेतूनच इतर विषयाचा अभ्यास करू शकतात.

४. बोर्डाची परीक्षाही खूप सोपी होणार, पूर्वी बोर्डाच्या परीक्षेच्या वेळी बोर्डाची तयारी फक्त दोन-तीन महिन्यांत अभ्यास करूनच करायची, असे वाटणारे विद्यार्थी, ही पद्धत रद्द होणार, आता विद्यार्थ्यांना वर्षभर अभ्यास करा आणि बोर्डाची परीक्षा दोन टप्प्यात घेता येईल.

५. अभ्यास सोपा करण्याबरोबरच विद्यार्थ्यांना समजून घेता यावे यासाठी आर्टिफिशियल इंटेलिजन्स सॉफ्टवेअरचाही अभ्यास क्षेत्रात वापर केला जाईल.

६. उच्च शिक्षण स्तरावरील एमफिल पदवी रद्द करण्यात येत आहे.

७. नवीन शैक्षणिक धोरणांतर्गत मुख्य अभ्यासक्रमात अभ्यासक्रमेतर उपक्रम ठेवण्यात आले आहेत.

८. नवीन शैक्षणिक धोरण २०२२ अंतर्गत, विद्यार्थ्यांना ३ भाषा शिकविल्या जातील, ज्या राज्याला त्यांच्या स्तरावर निश्चित कराव्या लागतील.

९. नवीन शैक्षणिक धोरण २०२२ अंतर्गत राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषदेद्वारे शालेय शिक्षणासाठी राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा तयार केला जाईल.

१०. तळागाळात नवीन शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी करण्यासाठी भारतात अनेक संस्था स्थापन केल्या जातील. ज्यामुळे नवीन शैक्षणिक धोरण (NEP) सुरळीत चालण्यास मदत होईल.

११. हे नवीन शैक्षणिक धोरण आल्याने कुशल मुलांवर अधिक लक्ष दिले जाणार असून, त्यांना विशेष शिक्षण दिले जाणार आहे.

१२. भारताचे नवीन शैक्षणिक धोरण आल्याने विद्यार्थ्यांवरील अभ्यासाचे ओझे कमी होऊन त्यांची शैक्षणिक क्षेत्रात खूप प्रगती होईल. म्हणजेच आता विद्यार्थी कुशल आणि सक्षम होतील.

**महत्त्वाची आव्हाने :**

सध्या नव्या शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीने जरी जोर धरलेला असला तरीही ते पूर्णत्वाला जाण्याच्या मार्गावर अनंत आव्हाने आहेत. भारताच्या शैक्षणिक क्षेत्रातील विविधता आणि आकार लक्षात घेता या धोरणाची अंमलबजावणी हे एक अवघड काम असणार आहे. उदाहरणासाठी आपण शालेय शिक्षण व्यवस्थेचा विचार करू. १५ लाखाहून अधिक शाळा, २५ करोड विद्यार्थी आणि ८९ ला शिक्षकांसह भारतातील शिक्षण व्यवस्था ही जगातील दुसऱ्या क्रमांकावरील शिक्षण व्यवस्था आहे.

उच्च शिक्षण व्यवस्थेचा आकारही फार मोठा आहे. एआयएसएचई २०१९ च्या अहवालानुसार, भारताच्या उच्च शिक्षण क्षेत्रात जवळपास १००० विद्यापीठे, ३९,९३१ महाविद्यालये आणि १०,७२५ स्वायत्त संस्थांमध्ये मिळून ३.७४ करोड विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. राज्य, जिल्हा तसेच तालुका स्तरावरील सर्व भागधारकांना एकत्र आणून या नव्या शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी करणे ही एक अत्यंत कठीण बाब ठरणार आहे. विलक्षण विविधता असलेल्या राज्यांमधील तसेच जिल्हास्तरावरील विविध भागधारकांमध्ये सामाजिक जबाबदारी व मालकीची भावना निर्माण करणे हे शिक्षण मंत्रालयासाठी मोठे आव्हान असणार आहे.

दुसरी महत्वाची गोष्ट म्हणजे नव्या शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी देशांच्या, राज्याच्या आणि सरकारांच्या क्षमतेवर अवलंबून आहे. भारताच्या शिक्षण व्यवस्थेमध्ये निधीची कमतरता आहे. संपूर्ण व्यवस्था ही नोकरशाहीवर आधारलेली आहे व नवीन कल्पना आणि वाढीच्या क्षमतेस शिक्षण व्यवस्थेत प्रतिकूल वातावरण आहे असे के. कस्तुरीरंगन यांच्या अध्यक्षतेखालील मसुदा समितीने निदर्शनास आणून दिले आहे.

नव्या शैक्षणिक धोरणामध्ये कल्पना केलेल्या परिवर्तनांच्या विशालतेला चालना देण्यासाठी शिक्षण मंत्रालये (केंद्र आणि

राज्ये) आणि इतर नियामक संस्थांमधील अंतर्गत क्षमता अत्यंत अपुरी आहेत. उदाहरणार्थ, पारंपरिक शिक्षणाकडून प्रयोगात्मक शिक्षण व टिकात्मक विचारापर्यंत जाण्यासाठी ही शिक्षण व्यवस्था चालवणाऱ्या लोकांच्या व सोबतच शिक्षण, विद्यार्थी व पालकांच्या दृष्टिकोनात बदल होणे गरजेचे आहे.

याचा अर्थ असा की या मोठ्या उपक्रमाची अंमलबजावणी करण्यासाठी हजारो शाळा व महाविद्यालयांच्या क्षमता वाढीस व पुनर्निर्देशनास हातभार लावणे आवश्यक आहे. थोडक्यात, मंत्रालयाची विद्यमान संघटनात्मक रचना आणि प्रणालीमध्ये मोठ्या प्रमाणात फेरबदल करावे लागणार आहेत.

नव्या शैक्षणिक धोरणाच्या दस्तऐवजामध्ये विद्यमान नियामक व्यवस्थेत सर्वसमावेशक व आमुलाग्र बदल घडवून आणण्याचा मार्ग आखण्यात आला आहे ही एक आशादायक बाब आहे. शिक्षण मंत्रालय सध्या भारत उच्च शिक्षण आयोगाच्या स्थापनेसाठी एक कायदा आणण्याच्या प्रयत्नात आहे. यूजीसी, एआयसीटीई आणि राष्ट्रीय शिक्षक प्रशिक्षण परिषदेच्या जागी भारत उच्च शिक्षण आयोग स्थापन करण्याचा विचारात सरकार आहे.

तिसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे हे धोरण मुख्यत्त्वे केंद्र आणि राज्यांमधील सहकार्यावर अवलंबून असणार आहे. या धोरणाचा मसुदा केंद्र सरकारने राज्य सरकारांसह विविध भागधारकांच्या योगदानातून तयार केला असला तरी त्याची अंमलबजावणी मुख्यत्वे राज्यांच्या सक्रिय सहकार्यावर अवलंबून आहे. याचे मुख्य कारण म्हणजे बहुतांश सेवांवर आधारित शैक्षणिक उपक्रम राज्य सरकारांकडून चालवले जातात. तामिळनाडू राज्याने नव्या शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी न करण्याची भूमिका अनुसरली आहे. अशीच भूमिका जर इतर राज्यांनीही घेतली तर केंद्राच्या चिंतेत वाढ होऊ शकते. त्यामुळे केंद्राकडून संघराज्याची समीकरणे कशाप्रकारे हाताळण्यात येत आहेत. यावर नव्या शैक्षणिक धोरणाचे भवितव्य ठरणार आहे.

चौथी महत्वाची बाब म्हणजे या धोरणाच्या दृष्टीने खाजगी क्षेत्राची भूमिका महत्वाची ठरवणार आहे. भारतातील जवळपास ७० टक्के उच्च शिक्षण देणाऱ्या संस्था या खाजगी आहेत. तसेच एकूण संख्येच्या जवळपास ६० ते ७० टक्के विद्यार्थी खाजगी संस्थांमध्ये उच्च शिक्षण घेत आहेत. खाजगी क्षेत्र आर्थिक संसाधने व नावीन्यपूर्ण कल्पना प्रदान करतात याकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. या धोरणाच्या प्रक्रियेसाठी खाजगी क्षेत्राचे योगदान मिळवणे व यातील एक महत्वाचा भागीदार म्हणून खाजगी क्षेत्राच्या योगदानाला मान्यता देणे ही एक महत्वाची बाब आहे.

सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे विविध उपक्रमाच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी येत्या दशकात पुरेल अशा संसाधनांची गरज लागणार आहे. या संदर्भात, या धोरणात म्हटल्याप्रमाणे नव्या धोरणाची उद्धिष्टे साध्य करण्यासाठी देशाला शिक्षणावरील सार्वजनिक खर्च एकूण देशांतर्गत उत्पन्नाच्या ६ टक्क्यापर्यंत वाढवावा लागेल. भूतकाळात देण्यात आलेली आश्वासने आणि त्यांची प्रत्यक्ष पूर्तता यांचा विचार केल्यास हे नक्कीच कठीण काम असणार आहे. आश्चर्यकारक बाब म्हणजे ज्या वर्षी हे नवे शैक्षणिक धोरण आले त्यावर्षी शिक्षणावरील खर्च हा सर्वात कमी होता. २०२०-२१ मध्ये शिक्षणावरील खर्च ९९.३११ कोटीवरून २०२१-२२ मध्ये ९३.२२४ कोटी इतका कमी झाला.

**दिवेश मते**

बी.एस्सी. भाग-३

# राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-२०२० : एक नवी दिशा

विचारांना स्पर्श करत असतांना 'शिक्षण म्हणजे काय ?' हे कळणं मला गरजेच वाटलं. म्हणून स्वामी विवेकानंद यांच्या मते Education is the manifestation of perfection already in men मला असे वाटते. मानवाचा सर्वांगीण विकास करणे सर्वात गरजेच असतं. यासाठी आवश्यक असते ते म्हणजे 'शिक्षण'. गेल्या तब्बल ३४ वर्षानंतर आपल्या देशात नवीन शैक्षणिक धोरणाला आताच केंद्रिय मंत्रिमंडळाने मंजुरी दिली आहे.

इस्त्रोचे माजी प्रमुख के. कस्तुरीरंगन यांच्या अध्यक्षतेखाली समितीने धोरणाचा मसुदा तयार केला. मग या शैक्षणिक धोणातले बदल कोणते ? पहिला बदल तो म्हणजे नावात बदल करण्यात आला. मानव संशोधन विकासच्या एवजी आता शिक्षण खातं असं म्हटलं तरी चालेल. १०+२ च्या एवजी ५+३+३+४ असा सुत्र लागु करण्यात आला आहे. हा आमुलआग्र बदल या नवीन शैक्षणिक धोरणात केल्या गेला. यातील विद्यार्थ्याला नवीन संधी प्राप्त होतील. यानंतर पुर्व प्राथमिक शिक्षणाकडे जास्त लक्ष दिल्या जाईल. पुर्वी जुन्या शैक्षणिक धोरणामध्ये त्याची खुप उपेक्षा झाली.

खरंतर पहिले ५ वर्ष हा आपला जडनघडणीतील सर्वात महत्त्वाचा काळ असतो. मग या नवीन शैक्षणिक धोरणामध्ये या पुर्व प्राथमिक शिक्षणाकडे जास्त लक्ष दिल्या गेलं. ही एक नवीन संधी आहे. त्याचबरोबर शिशुशिक्षण कशी असावी याबद्दल त्यामध्ये नवीन सुचना दिल्या आहे. हा एक महत्त्वाचा मुद्दा आहे.

तर हा 'ब्यारलेड स्प्रेड' म्हणजे नेमकं काय ? या नवीन शैक्षणिक धोरणाच्या अभ्यास करत असतांना हा नवीन आराखडा त्या मध्ये दिसुन आला. तर हा period असणारा १० दिवसाचा. यामध्ये विद्यार्थ्यांना व्यवसाय विमुख, प्रेरणादायी Expert Lecture अरेंज केले जाणार याचा उद्देश्य हाच कि 'प्रत्येक विद्यार्थी हा व्यवसायिक दृष्टीने बनला पाहिजे'. निवड नौकरीसाठी लोक तयार करणारे शिक्षण धोरण नाही. तर हे शिक्षण धोरण व्यवसायाचे मालक बनवणारे शैक्षणिक धोरण आहे.

या नवीन शैक्षणिक धोणामाघचा हेतू असा दिसून येतो कि प्रत्येक विद्यार्थी हा स्वावलंबी असायला हवा. ही झाली विषयाची एक बाजू. तर आता विषयाची दुसरी बाजू बघु या. नवीन शैक्षणिक धोरणातील संधी व आव्हाने :- तर कोणती आव्हाने असु शकतात ?

सर्वप्रथम भारतात कोणतेही आव्हान किंवा योजना घडुन आलं तर त्याची अंमलबजावणी करणे गरजेच आहे. तर आपण मागील धोरणात पाहलं आहे. ६% जीडीपी हा शिक्षणासाठी खर्च व्हायला हवा होता. पण ६% जीडीपी पैकी ३% जीडीपी शिक्षणासाठी खर्च करण्यात आला. मग अस या नवीन शिक्षण धोरणात घडायला नको. फक्त कागद पत्रा पुर्त मर्यादीत रहायला नको. हे धोरण म्हणून त्याची अंमलबजावणी होणं गरजेचं आहे. आपण बघतच असतो ज्या सरकारी शाळा आहेत त्यांना पायाभूत सुविधा उपलब्ध होणं गरजेच आहे. नाहीतर देशातील २८% शाळेतील मुलींना बाथरूमची व्यवस्था नाही. देशातील ५४% शाळेत बाथरूम तर आहे पण त्यामध्ये पाण्याची व्यवस्था नाही. मग सरकारी शाळेकडे पालकांच पाहण्याचं दृष्टीकोण बदलतो. सरकारी शाळेचही महत्व वाढायला हवं. त्यात गरीबांना पण शिक्षण घेता आलं पाहीजे.

त्यानंतर नवीन शिक्षण धोरण पाहत असतांना ऑनलाईन शिक्षणात जास्त भर दिला आहे. मग ऑनलाईन शिक्षण जो गरीब सामान्य विद्यार्थी आहे त्याला हे शिक्षण घेता येईल का ? त्याला हे परवडील का ? तो ते शिक्षण घेऊ शकेल का ? हा विचार करणं ही कुठे ना कुठे गरजेच होतं.

नाहीतर आपला मित्र स्वप्नील मानेकर यांनी लिहिलेली ही कविता –

'सांगा सांगा साहेब तुमच्या ऑनलाईन शिक्षणात धरावा कसा ?
दोन वेळेच्या तुकड्यासाठी खपुन खपुन कोरडा पडतो माझ्या बापाचा घसा !''

त्यानंतर याही पुढ जाऊन सांगायचं असलं तर नवीन कौशल्य आधारित शिक्षण हा शब्द बऱ्याच वेळ आला अरे.... कौशल्य, कौशल्य, कौशल्य ! कौशल्य आधारित शिक्षण म्हणजे यंत्र आणि तंत्र आधारित पिढी घडवायची आहे का ? कौशल्य आधारित शिक्षणाला विरोध नाही. पण संशोधन रिसर्च इत्यादि गोष्टीकडे ही विद्यार्थ्यांचा ओढा कायम असायला पाहिजे असे मला वाटते.

कोणतेही शिक्षण धोरण घडवत असतांना ते नक्कीच भविष्याचा विचार करून घडवल्या जातं. परंतु जोपर्यंत त्याची अंमलबजावणी प्रामाणिकपणे होत नाही तो पर्यंत त्याचे आपल्याला परिणाम दिसणार नाहीत.

**कु. निकीता चव्हाण**
बी.एस्सी. भाग–२

---

# खिडकी

रोज नवे आशेचे किरण देणारी
कुठे ही असो माझी अतिशय लाडकी
अखंड जगाचे संक्षिप्त रूप दाखवणारी ती म्हणजे खिडकी
पावसाळ्याच प्रेमळ दृश्य दाखवणारी तु
माझ घरातील सर्वात आवडत ठिकाण तु
नेट प्रोब्लेम ची सोल्यूशन तु
तर शेजाराच्या भावनांचा वाय–फाय तु
आजी साठी जशी सीसीटीव्ही तु
आजोबांच्या चहाचे ठिकाण तु
बायकांच्या चुगल्यांचा बायपास तु
जणू घराचा मोठा कान तु
पण माझ्यासाठी सु:खातही तु दु:खातही तु
जगाला आपल्या नजरेत निर्मळ
करून कस बघायच हे शिकवणारी तु
तुझ्यातून दिसणाऱ्या निखळ दृश्याने
माझ्या भावनांना सांत्वन देणारी तु अशी माझ्या आयुष्यातली एक प्रेमळ गोष्ट तु

**शिवराज ठाकरे**
बी.एस्सी. भाग–२

# राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० : एक आमुलाग्र बदल

आपल्या मनात विचार आला असेल हे काय नविन ? असे म्हणतात की सजीव बदल मागत असते आणि जो बदलत गेला तो टिकला. मी एक सोप उदाहरण देते, जसे की हजारो वर्षापूर्वी अमिबा–जलचर–उभयचर असे बदल मागत मागत आपण, म्हणजेच मनुष्याची उत्पत्ती झाली आणि आपण सुद्धा प्रगतिच्या मार्गावर आहो. मला असे सांगायचे आहे की आता जर आपल्याला बदल मागायचा असेल तर तो म्हणजे आपल्या शिक्षण पद्धतीत ! कारण 'शाळा हा समाजाचा आरसा आहे'. शाळा हे विद्यार्थीच नाही तर समाज घडविण्याचे कार्य सुद्धा करतात. समाज घडविण्यासाठी आणि विद्यार्थ्यांची शारीरिक, मानसिक, बौद्धिक प्रगती करण्यासाठी गरजेचे असते ते म्हणजे शिक्षण पद्धती आणि नुकतच, म्हणजे तब्बल ३४ वर्षानंतर आपल्या देशात 'राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०' जाहीर करण्यात आले आहे. इस्त्रोचे माजी प्रमुख के. कस्तुरीरंगन यांच्या अध्यक्षतेखालील समितीने या धोरणाचा मसुदा तयार केला आहे. या शैक्षणिक धोरणातील महत्वाच्या गोष्टी कोणत्या ? येणाऱ्या काळात शिक्षण पद्धतीत कोणते आमुलाग्र बदल होणार यांचा मुद्देसूद अभ्यास करणार आहोत. याआधी १९८६ मध्ये शैक्षणिक धोरण तयार करण्यात आलं होतं. यामध्ये १९९२ मध्ये बदल करण्यात आले. त्यानंतर आता ३४ वर्षांनी शैक्षणिक धोरण तयार करण्यात आले आहे.

नविन शैक्षणिक धोरण ''१०+२ ऐवजी ५+३+३+४'' अशी शैक्षणिक व्यवस्था असणार आहे. पाचवीपर्यंत मातृभाषेत शिकवलं जाणार असून सहावीपासून व्यावसायिक शिक्षणाचा समावेश सुरु होणार, जेणेकरून विद्यार्थ्यांना त्या विषयात रूची निर्माण होणार. या सोबत आपल्याला माहित आहे की शैक्षणिक धोरण १०+२ मध्ये बोर्ड परीक्षेला किती महत्व असायचं, त्यामुळे विद्यार्थ्यांच्या मनात बोर्ड परीक्षेची खुप भिती असायची. त्यामुळे त्यांचा आत्मविश्वास कमी व्हायचा. परंतु आता नविन शैक्षणिक धोरणा अंतर्गत बोर्ड परीक्षेचं महत्व कमी केलं जाणार आहे. बोर्ड परीक्षेत फक्त पाठांतराला महत्व न देता दैनंदिन आयुष्यात उपयोगी येणाऱ्या ज्ञानाचा वापर केला जावा याचा नव्या धोरणात उल्लेख आहे.

**महत्वाचे मुद्दे :**

देशातील प्रमुख आठ भाषांमध्ये ई–कोर्सेस विकसित करणार. या शैक्षणिक धोरणात सर्वात चांगली गोष्ट जी मला वाटते ते म्हणजे विद्यार्थी एकत्रितपणे दोन शाखांचा अभ्यास करू शकतात आणि बोर्ड परीक्षांचं महत्व कमी करून पाठांतराऐवजी ज्ञानाला प्राधान्य दिलं जाणार. नवीन शैक्षणिक धोरणानुसार शालेय विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित केला जाणार आहे. या धोरणातील तरतुदीनुसार ३ ते १४ वर्ष वयोगटाचे विद्यार्थी शिक्षण हक्क कायद्याच्या कक्षेत आले आहेत. यापूर्वी हा वयोगट ६ ते १४ वर्ष होता. ३–६ वर्ष हा आतापर्यंत समाविष्ठ न झालेला वयोगट शालेय जडणघडणीच्या विकासासाठी अतिशय महत्वाचा मानला जातो. तसेच हा वयोगट, बालकाच्या मानसिक जडणघडणीच्या विकासासाठी महत्वाचा आहे. एनसीईआरटी, बालवयाच्या सुरवातीची काळजी आणि शिक्षण यासाठी ८ वर्षापर्यंतच्या बालकांसाठी राष्ट्रीय अभ्यासक्रम आणि शैक्षणिक आराखडा विकसित करणार आहे.

आपण आपल्या आजुबाजुला बघत असतो की कित्येक विद्यार्थ्यांचे graduation, post-graduation झालेले असते तरी सुद्धा ते 'सुशिक्षित बेरोजगार' आहेत, जर दुसऱ्या देशांच्या विद्यार्थ्यांचा विचार केला तर त्यांच्यासोबत हे होत नाही. तिकडले विद्यार्थी कमी शिकून सुद्धा आयुष्यात यशस्वी होतात. आपल्या भारतात असे का बरं होत नाही ? हा प्रश्न डोक्यात नक्कीच आला असेल. त्याचे मुख्य कारण म्हणजे 'कौशल्ये विकास' जर आपल्या गावाला, शहराला व देशाला प्रगतीच्या मार्गावर न्यायचे असेल

तर आपल्याला म्हणजेच विद्यार्थ्यांना आत्मनिर्भर बनावं लागेल. त्यासाठी आपल्या शिक्षणपद्धतीत कौशल्ये विकास यावर जास्तीत जास्त भर दिले पाहिजे. विनोबांच्या मते –

''शिक्षक विद्यार्थीनिष्ठ असावा, विद्यार्थी ज्ञाननिष्ठ असावा, ज्ञान हे समाजनिष्ठ असावे व समाज समतानिष्ठ असावे कारण शिक्षक कर्तव्य तज्ञ नागरीक निर्माण करतो.''

तसेच शिक्षकांनी कमीत–कमी शिकवून विद्यार्थी स्वत: अधिका अधिक शिकेल यावर भर दिला पाहिजे.

शैक्षणिक धोरण २०२० हे २०२२–२०२३ पासून लागु होणार आणि या नविन धोरणा अंतर्गत खरच अमुलाग्र बदल घडून येतील आणि ते बदल चांगलेच राहतील असे मला वाटते. या शैक्षणिक धोरणात कला, क्रीडा, संगीत, योग, समाज सेवा या विषयांना अभ्यासक्रमात समाविष्ठ करण्यात येणार आहे व विद्यार्थ्यांचा सर्वांगिण विकासाचं तिहेरी रिपोर्ट कार्ड तयार केला जाणार आहे. विद्यार्थी स्वत:चे मुल्यांकन करणार याशिवाय शाळेतुन बाहेर पडतांना विद्यार्थ्याला किमान एक व्यावसायिक कौशल्ये प्राप्त व्हायला हवं अस शिक्षण या धोरणा अंतर्गत देण्यात येणार आहे. बोर्ड परीक्षेत फक्त पाठांतराला महत्व न देता दैनंदिन आयुष्यात उपयोगाला येणाऱ्या ज्ञानाचा वापर केला जावा याचा या धोरणात उल्लेख आहे.

माझ्या मते विद्यार्थी हे बनण्याऐवजी बनावे. कारण सर्वच विद्यार्थ्यांनी असा विचार केला की मला पाहिजे तर कोण करणार. आपल्या देशात यांच्याकडे विद्यार्थ्यांनी लक्ष दिले तर खरच आपल्या देशातील विद्यार्थ्यांना दुसऱ्या देशात नोकरीसाठी जावेच लागणार नाही. पुढे ऐवढेच सांगेल –

''पुन्हा नवे वर्ष पुन्हा नवी आशा,
तुमच्या कर्तृत्वाला पुन्हा नवी दिशा
नवे स्वप्ने नवी क्षितीजे नवी ध्येय
नव्या इच्छा सोबत माझ्या शुभेच्छा''

**कु. निकीता तायडे**
बी.एस्सी. भाग–३

# एक सत्य....

जी माणसं हवीशी वाटतात,
ती कधीही भेटत नाहीत....
जी माणसं नकोशी वाटतात,
त्यांचा सहवास संपत नाही....
ज्यांच्याकडे जावेसे वाटते,
त्यांच्याकडे जायला जमत नाही....
ज्यांच्याकडे जाऊ नये असे वाटते,
त्यांच्याकडे जावेच लागते ....

जेव्हा जीवन नकोसे वाटते,
तेव्हा काळ संपत नाही....
जेव्हा जीवनाचा खरा अर्थ कळतो,
तेव्हा काळ संपलेला असतो....
नसीब हे असचं असतं,
त्याच्याशी जपुन वागावं लागत....
तिथे कोणाचेच चालत नाही,
जिकडे नेईल तिकडे जावेच लागते....

**प्रा. उज्वला स. डांगे**

# नवीन शैक्षणिक धोरण : महत्त्वाचे पाऊल

जग हे जागतिक खेडे होत असतांना समाजाच्या उन्नतीसाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर विचार घेऊन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचे आम्ही स्वागत करीत आहोत. पुढची पिढी आत्मनिर्भर भारतासाठी, नवनिर्माणसाठी सज्ज होणाच्या दिशेने टाकलेले एक पाऊल म्हणजे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० होय.

शालेय आणि उच्च शिक्षणात मोठ्या प्रमाणात परिवर्तनात्मक सुधारणांना यात मोठा वाव देण्यात आला आहे. २१व्या शतकातले हे पहिले शिक्षण धोरण असुन ३४ वर्ष जुन्या १९८६ च्या शिक्षणावरच्या राष्ट्रीय धोरणाची जागा नवे धोरण घेणार आहे. सर्वांना संधी, नि:पक्षपात, दर्जा, परवडणारे आणि उत्तरदायित्व या स्तंभावर याची उभारणी करण्यात आली. २०३० च्या शाश्वत विकास कार्यक्रमाशी याची सांगड घालण्यात आली आहे. शालेय आणि महाविद्यालयीन शिक्षण अधिक समग्र, बहू शाखीय, २१ व्या शतकाच्या गरजा अनुरूप करत भारताचे चैतन्यशील प्रज्ञावंत समाज आणि जागतिक ज्ञान महासत्ता म्हणून परिवर्तन घडवण्याचा आणि प्रत्येक विद्यार्थ्यांच्या आगळ्या क्षमता पुढे आणण्याचा या धोरणाचा उद्देश आहे.

**नवीन शैक्षणिक धोरण २०२०**

तब्बल ३४ वर्षानंतर आपल्या देशात 'नवीन शैक्षणिक धोरण २०२०' जाहीर करण्यात आले आहे. इस्त्रोचे माजी प्रमुख के. कस्तुरीरंगन यांच्या अध्यक्षतेखाली समितीने या धोरणाचा मसुदा तयार केला आहे. या शैक्षणिक धोरणातील महत्त्वाच्या गोष्टी कोणत्या ? येणाऱ्या काळात शिक्षण पद्धतीत कोणते अमुलाग्र बदल होणार आहेत याचा मुद्देसुद अभ्यास करणार आहोत.

**शैक्षणिक धोरणाचा इतिहास**

१. आपल्या देशात सर्वात प्रथम पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या काळात १९६८ साली पहिले राष्ट्रीय धोरण जाहीर करण्यात आले.
२. त्यानंतर राजीव गांधी यांच्या कार्यकाळात १९८६ साली दुसरे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण जाहीर करण्यात आले.
३. त्यानंतर १९९२ मध्ये आचार्य राममुर्ती यांच्या अध्यक्षतेखाली 'राष्ट्रीय शिक्षणर धोरण कृती आराखडा' समिती स्थापना करण्यात आली. या समितीने दुसऱ्या शैक्षणिक धोरणाची आढावा घेतला व काही शिफारशी केल्या.
४. अटलबिहारी वाजपेयी यांच्या कार्यकाळात सन २००२ मध्ये ६वी घटना दुरूस्ती करण्यात आली.
५. त्यानंतर सन २००९ साली शिक्षण हक्क कायदा मंजूर करण्यात आला. या कायद्याची अंमलबजावणी २०१३ पासून करण्यात आली.

**नवीन शैक्षणिक धोरण २०२० वैशिष्ट्ये**

नवीन शैक्षणिक धोरण २०२० अंतर्गत शालेय व उच्च शिक्षणाच्या रचनेत अमुलाग्र बदल करण्यात आले आहेत. शिक्षण अभ्यासक्रमांना वेगवेगळ्या शाखांच्या चौकटीतून बाहेर काढून आंतरशाखीय आणि समन्वयी करण्यात आले. याचाच सोपा अर्थ असा आहे की आता एकाचवेळी अभियांत्रिकी व संगीत हे दोन्ही विषय घेऊनही उच्च शिक्षण पुर्ण करता येईल. नवीन शैक्षणिक धोरणानुसार शालेय विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित केला जाणार असून २१व्या शतकासाठी आवश्यक कौशल्ये प्रदान करण्याला महत्त्व देण्यात आले आहे.

**शालेय शिक्षणाची रचना नवीन सूत्र :**

या धोरणातील तरतुदीनुसार तीन ते चौदा वर्षे वयोगटाचे विद्यार्थी शिक्षण हक्क कायद्याचा या कक्षेत आले आहेत. यापूर्वी हा

वयोगट ६ ते १४ वर्षे होता. शालेय शिक्षणाची रचना आता ५+३+३+४.

**५ वर्षे मुलभूत (Fundamental)**

१. नर्सरी
२. ज्युनिअर केजी
३. सिनिअर केजी
४. इयत्ता पहिली
५. इयत्ता दुसरी

**३ वर्षे प्रारंभिक शाळा (Prepatatory)**

६. इयत्ता तिसरी
७. इयत्ता चौथी
८. इयत्ता पाचवी

**३ वर्षे माध्यमिक शाळा (Middle)**

९. इयत्ता सहावी
१०. इयत्ता सातवी
११. इयत्ता आठवी

**४ वर्षे माध्यमिक शाळा (Secondary)**

१२. इयत्ता नववी
१३. इयत्ता दहावी
१४. एफ.वाय.जे.सी.
१५. एस्.वाय.जे.सी.

**कसे दिले जाणार शिक्षण**

वरील शिक्षणाच्या नवीन सुत्रानुसार आपल्या लक्षात आलेच असेल आता अंगणवाडी ही प्राथमिक शिक्षणाला जोडली गेली आहे. वयोगट ३ ते ८ मधील शिक्षण हे मुलभूत शिक्षण समजले जाईल आणि त्यासाठी बालसुलभ शिक्षण आणि अभ्यासक्रम विकसित केला जाईल. अंगणवाडीच्या शाळा, पुर्वप्राथमिकच्या शाळा, प्राथमिक शाळेशी जोडण्यासाठी प्रयत्न केले जातील. ज्या ठिकाणी सध्या अस्तित्वात असलेल्या अंगणवाडी आणि पुर्वप्राथमिक शाळा नवीन अभ्यासक्रम राबविण्यात अपयशी ठरतील त्या ठिकाणी सर्व सोयींनी युक्त नवीन स्वतंत्र पुर्व प्राथमिक शाळा उभारल्या जातील आणि शिक्षणाबरोबर ३ ते ६ वयोगटातील मुलाच्या बौद्धिक, मानसिक आणि शारीरिक विकासासाठी आवश्यक सुविधा निर्माण केल्या जातील.

३ ते ८ या वयोगटातील मुलासाठी उपक्रमाधारीत खेळांच्या माध्यातुन आणि लवचिकता असलेले शिक्षण दिले जाईल. पुर्व प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत मुलांमध्ये मुलभूत साक्षरता आणि संख्याज्ञान यावे यासाठी प्रयत्न करण्यात येतील.

**भाषा, व्यावसायिक शिक्षण आणि मुलांचे मानसशास्त्र**

इयत्ता सहावी नंतर तीन भाषा शिक्षणपद्धती सुरु केली जाईल. ज्यात स्थानिक भाषेला प्राधान्य दिले जाईल. ज्या प्रदेशात

हिंदी बोलली जात नाही त्या प्रदेशात हिंदी भाषा शिक्षणाला प्राधान्य दिले जाईल. 'आता पाचवी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना केवळ मातृभाषा, स्थानिक भाषा आणि राष्ट्रीय भाषा शिकवली जाईल, उर्वरित विषय जरी तो इंग्रजी असला तरी एक विषय म्हणून शिकवला जाईल.'

व्यावसायिक शिक्षण शालेय शिक्षणात समाविष्ट केले जाईल. शाळांमध्ये असलेल्या हुशार मुलांना अपेक्षित शिक्षण मिळावे म्हणून 'राष्ट्रीय शिक्षण कार्यक्रम' अंतर्गत आठवड्याला पाच तासांचे अतिरिक्त शिक्षण पुरविले जाईल तसेच अपेक्षित क्षमतेपेक्षा मागे असलेल्या मुलांसाठी नियमित शाळेच्या वेळेत आणि वेळेनंतरही उपाययोजनात्मक शिक्षण पुरविले जाईल. प्रत्येक विद्यार्थ्यांकडे नीट लक्ष देता यावे यासाठी विद्यार्थी शिक्षक प्रमाण ३०:०१ असे ठेवणे.

वाचनाला आणि त्यातून ज्ञानवृद्धीला प्राधान्य मिळावे म्हणून संपूर्ण देशात सार्वजनिक ठिकाणी आणि शाळांमध्ये ग्रंथालय आणि वाचनकक्ष उभारणे.

**आंतरशाखीय शिक्षण**

९वी ते १२ वी एकत्र करून चार वर्षाचा कोर्स प्रस्तावित आहे ज्यामध्ये कला, वाणिज्य आणि शास्त्र असा शाखानिहाय फरक रद्द केला असून एकूण ८ सेमिस्टर चा कोर्स असेल त्यात भाषा, गणित आणि शास्त्र हे विषय बंधनकारक करून इतर कोणतेही विषय आपल्या आवडीनुसार निवडता येतील.

**परीक्षा कशा असणार ?**

नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार बोर्ड परीक्षांचे महत्त्व कमी करण्यात आले आहे. आता बोर्ड परीक्षा फक्त १२ वी मध्ये द्यावी लागेल, तर यापुर्वी दहावीची बोर्ड परीक्षा देणे बंधनकारक होते, ते आता होणार नाही. ९ ते १२ वीच्या सत्र परीक्षा असतील. पाठांतर करून उत्तर लिहिण्याऐवजी दैनंदिन उपयुक्त ज्ञानावर आधारीत परीक्षा असेल. विज्ञान व कला अशा वेगळ्या शाखांतील विषय एकत्र करून शिकता येतील. त्यामुळे आंतरशाखीय शिक्षण सुरु.

**विद्यार्थ्यांना नवीन प्रगतीपुस्तक**

नवीन शैक्षणिक धोरणामुळे जुने प्रगतीपुस्तक फक्त गुण व शिक्षकांचे शेरे न देता स्वत: विद्यार्थी, सहविद्यार्थी व शिक्षक यांनी मुल्यमापन करावयाचे आहे. त्या आराधावर विद्यार्थ्यांच्या जीवनकौशल्यांचा विकास करता येईल.

**शिक्षक होण्यासाठी काय करावे लागणार ?**

नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार बी.एड. रद्द करून चार वर्षांचा इंटिग्रेटेड पदवी कोर्स सुरु करण्यात येईल. बारावीनंतर थेट या कोर्सला प्रवेश घेता येईल आणि हे शिक्षक प्राथमिक आणि माध्यमिक शाळांमध्ये नियुक्तीसाठी पात्र ठरतील. ज्यांनी इंटीग्रेटेड बी.एड. केलेले नाही ते पदवीनंतर महाविद्यालयात एक वर्षाच्या बी.एड. साठी प्रवेश घेऊ शकतील.

**थेट पीएच.डी.**

उच्च शिक्षणातही लवचिकता आणली गेली असून महाविद्यालये तसेच विद्यापीठांमध्येही आंतरशाखीय विषय एकत्र शिकतायेतील. कुठल्याही शिक्षण थांबवता येईल. त्या शिक्षणाचे गुणांक राखून ठेवले जातील व काही काळाने पुढील शिक्षण घेता येईल. ज्या विद्यार्थ्यांना संशोधन करायचे असेल, त्याच्यासाठी चार वर्षांचा अभ्यासक्रम असेल त्यानंतर एम.फिल. करण्याची गरज उरणार नाही. थेट पीएच.डी.साठी प्रवेश घेता येईल.

**आता एकच नियामक मंडळ**

हा एक मोठा निर्णय नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात घेण्यात आला आहे. सध्या उच्च शिक्षणातील विविध अभ्यासक्रमांसाठी वेगवेगळ्या नियामक संस्था कार्यरत आहे, त्याऐवजी एकच नियामक मंडळ असेल. अमेरिकेप्रमाणे भारतातही संशोधकाला महत्त्व देणे व त्याचा दर्जा सुधारण्यासाठी राष्ट्रीय संशोधक संस्था स्थापन केली जाईल. केवळ विज्ञानच नव्हे तर समाजशास्त्रातील संशोधनालाही वित्तीय मदत केली जाईल. देशातील उच्च शिक्षणाचा दर्जा आंतरराष्ट्रीय स्तरावर नेला जाईल. त्यातून परदेशी दर्जेदार शिक्षणर संस्थांतील विद्यार्थ्यांची संवाद वाढेल व शैक्षणिक देवाणघेवाण ही होऊ शकेल. यामुळे सुसंगत शिक्षणपद्धती अस्तित्वात येणार आहे.

**शिक्षणासाठी वित्तपुरवठा**

शैक्षणिक क्षेत्रामध्ये सार्वजनिक गुंतवणुक वृद्धीसाठी केंद्र आणि राज्य सरकारे एकत्रित काम करणार आहेत. शक्य तितक्या लवकर ही गुंतवणूक जीडीपीच्या ६ टक्क्यापर्यंत पोहोचावी, असा उद्देश यामागे आहे.

**शिक्षणामध्ये तंत्रज्ञान**

'नॅशनल एज्युकेशन टेक्नॉलॉजी फोरम' म्हणजेच 'राष्ट्रीय शैक्षणिक तंत्रज्ञान मंच' या स्वायत्त संस्थेची निर्मिती करण्यात येणार असून याद्वारे विचारांच्या देवाणघेवाणीसाठी एक व्यासपीठ–मंच उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

अशा प्रकारे शालेय आणि उच्च शिक्षणात मोठ्या प्रमाणात परिवर्तनात्मक सुधारणांना वाव देण्यात आला. २१व्या शतकातले हे पहिले शिक्षण धोरण असून ३४ वर्षे जुन्या १९८६ च्या शिक्षणावर च्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची जागा नवे शैक्षणिक धोरण घेणार आहे. सर्वांना संधी, नि:पक्ष पात दर्जा उत्तरदायित्व या स्तंभावर याची उभारणी करण्यात आली आहे.

**कु. चैताली लांजुडकर**
बी.एस्सी. भाग–१

# जगात काही सोपं नाही....

मिळवणं सोप असतं
टिकवणं तितकचं कठीण
आवडणं सोप असतं
निवडणं तितकचं कठीण
नाकारणं सोप असतं
स्विकारणं तितकच कठीण
बोलणं सोप असतं
अंगिकारणं तितकच कठीण
तोडणं सोप असतं
जोडणं तितकच कठीण

गमावणं सोप असतं
कमावणं तितकच कठीण
थांबणं सोप असतं
थांबवणं तितकच कठीण.
हसणं सोप असतं
हसवणं तितकच कठीण
अडखळणं सोप असतं
सावरणं तितकच कठीण
फुलणं सोप असतं
बहरणं तितकच कठीण.

**कु. दर्शना कुलकर्णी**
बी.एस्सी. भाग–२

# RLTion's Pride



**Ms. Rajeshwari Chavhan**
5th Merit in M.Sc. (Microbiology) Examination (S-2021) of S.G.B. Amravati University, Amravati



**Ms. Ankita Potodukhe**
8th Merit in M.Sc. (Chemistry) Examination (S-2021) of S.G.B. Amravati University, Amravati



**Ms. Sayali Kalmegh**
10th Merit in M.Sc. (Mathematics) Examination (S-2021) of S.G.B. Amravati University, Amravati



**Mr. Kshitij Tiwari**
M.Sc. (Computer Science)
Color in Boxing



**Ms. Aditi Chavan**
B.Sc.-I
Color in Cricket



**Ms. Mrunali Wawge**
M.Sc.-I (Mathematics)
Selected in Kabaddi & Wrestling Team of University



**Ms. Nalanda Damodar**
B.Sc.-I
Color in Judo



**Ms. Rutuja Badhe**
B.Sc.-II
Color in Wrestling







**Ms. Shreya Deshmukh**
B.Sc.-III
1st Position in Inter Group Shooting Competition, Mavalankar Camp, Pune

## Photo Gallery



Publication of College Annual Magazine 'Pratibimb'



Publication of IQAC Newsletter

# Photo Gallery




Blood Donation Camp



National Sports Day



Inter Collegiate Boxing Tournament



Inter Collegiate Wrestling Tournament



Kabaddi Selection Tiral



Cricket Women Selection Trial



Power Lifting Selection Trial




Taekwondo Team in I.C.T. Taekwondo Tournament

# राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० : एक नवी पहाट

**प्रस्तावना**

''शिक्षणाने चिकित्सक विचार कसा करावा आणि समस्या कशा सोडवाव्यात, तसंच सृजनशील आणि बहुविद्याशाखीय कसं असलं पाहीजे याकडे वळले पाहीजे. त्याचबरोबर, नवनिर्मिती कशी करावी, जुळवून कसं घ्यावं आणि नवीन बदलणाऱ्या क्षेत्रात नवीन साहित्य कसं आत्मसात करावं, याकडे देखील वळायला पाहीजे, अभ्यासक्रमाने शिक्षणाला अधिक प्रयोगशील, सर्वांगीण, एकात्मिक, चिकित्सक, वृत्ती जोपासणार शोध घेण्यास प्रवृत्त करणारं विद्यार्थीकेंद्रीत, चर्चा करण्यास प्रोत्साहन देणारं लवचिक आणि अर्थातच आनंददायी करण्यासाठी उत्क्रांत व्हायलाच पाहीजे.

होय हे सकळं नवीन नसले तरीही निखालसपणे आदर्श आहेत आणि आपल्यापैकी ज्यांनी रविंद्रनाथ टागोर, जे कृष्णमूर्ती आणि श्री अरविंदो यांच्या शैक्षणिक आदर्शांवर प्रेम केलं त्यांना हे माहीत आहे की शिक्षण हे कंटाळवाण्या / नित्यक्रमाच्या परिक्षेतील तत्काळ यशासाठी केलेलं तांत्रिक अध्ययन नाही. तसंच ते जिवंत अनुभव आणि सृजनशील शोधापासून तुटलेलं केवळ पुस्तकी ज्ञान नाही, वास्तविकपणे स्वातंत्र्याच्या आत्मविश्वाशिवाय आणि जागृत करणाऱ्या बुद्धिमत्तेशिवाय शिक्षणर हे केवळ क्षेणीबद्ध अध्ययन बनतं तो एक परात्मभावी उपक्रम बनतो. त्याचसाठी नवीन शिक्षण धोरण २०२० जाहीर केले आहे. सगळ्यांना शिक्षणाचे नियम कायदे माहीत व्हावे तसेच समान संधी मिळावी यासाठी याची अंमलबजावणी करण्यात आली आहे.

**परिचय....**

संपूर्ण मानवी क्षमता साध्य करण्यासाठी आणि विकसित करण्यासाठी शिक्षण हे मुलभूत आहे. समाज आणि राष्ट्रीय विकासाला चालना हे राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचे प्रमुख वैशिष्ठे आहेत. दर्जेदार शिक्षणासाठी सार्वत्रिक प्रवेश प्रदान करणे भारताच्या निरंतर प्रगतीची गुरूकिल्ली आणि आर्थिक वाढीच्या दृष्टीने जागतीक स्तरावर नेतृत्व, सामाजिक न्याय आणि समानता, वैज्ञानिक प्रगती, राष्ट्रीय एकात्मता आणि सांस्कृतिक संरक्षण ही या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणातून साध्य करण्यासाठी हे धोरण बनवण्यात आले आहे.

सार्वत्रिक उच्च–गुणवत्तेचे शिक्षण त्याचबरोबर आपला विकास व्यक्ति, समाज, देश आणि देशाच्या भल्यासाठी देशातील समृद्ध प्रतिभा आणि संसाधने मजबूत करण्यासाठी हे शैक्षणिक धोरण आहे. भारतातील तरूणांची संख्या जगात सर्वाधिक आहे. हे तरूण भारताचे उज्वल भविष्य आहे. त्यासाठी त्यांना उच्च दर्जाच्या शैक्षणिक संधी उपलब्ध करून देण्याची प्रतिबद्धता या नव्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० मधून साध्य करण्याचा यशस्वी प्रयत्न दिसतो. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० आपल्या देशाचे भविष्य निश्चित करेल.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० हे २१ व्या शतकातील पहिले शैक्षणिक धोरण आहे आणि त्याचे उद्धिष्ट आहे आपल्या देशाच्या वाढत्या विकासात्मक गरजा पूर्ण करा हे राष्ट्रीय धोरण २०२० प्रस्तावित करते. शिक्षण संरचनेचा सर्व पैलूची सुधारणा त्यात त्याचे नियमन आणि २१व्या शतकातील महत्वकांक्षी उद्धिष्टांशी सुसंगत असलेली नवीन व्यवस्था निर्माण करण्यासाठी शासनाने धोरण आणले आहे.

**१. नविन शैक्षणिक धोरण भारतातील शिक्षण व्यवस्थेसाठी भविष्योन्मुखी दृष्टीकोन :**

शिक्षण व्यवस्थेतील मुलभूत सुधारणांच्या केंद्रस्थानी शिक्षक असला पाहिजे, नवीन शिक्षण धोरणाने शिक्षकाला सर्व

पातळ्यांवर आपल्या समाजातील सर्वात आदरणीय आणि आवश्यक सदस्य म्हणून पुर्नस्थापित करण्यासाठी मदत करणे आवश्यक आहे. कारण तो खरोखर आपल्या नागरिकांच्या पुढील पिढीला आकार देतो. शिक्षणाला सक्षम करण्यासाठी आणि त्यांनी आपले काम शक्य तितक्या प्रभावीपणे करणे म्हणून या धोरणाने शक्य त्या सर्व गोष्टी केल्या पाहिजे. सर्वोत्तम आणि बुद्धिमान व्यक्तिंना सर्व पातळीवर शिक्षकी पेशाव समजून घेण्यासाठी नवीन शिक्षण धोरणाने मदत केली पाहिजे. नवीन शिक्षण धोरणाने सर्व विद्यार्थ्यांना ते कुठेही राहत असले तरीही चांगल्या गुणवत्तेची शिक्षण व्यवस्था पुरवली पाहीजे आणि उपेक्षित, वंचित आणि अन्य प्रतिनिधित्व असलेल्या गटांवर विशेष लक्ष केंद्रीत केले पाहिजे. शिक्षण हे समानता सुनिश्चित करण्याचे मोठे माध्यम आहे आणि याद्वारे समाजात समानता सर्व समावेशकता आणि सामाजिक आर्थिक गतिशिलता साध्य करता येते.

वरिल गटातील विद्यार्थ्यांना काही अडथळे असले तरीही शिक्षण व्यवस्थेत प्रवेश घेण्यासाठी आणि त्यात त्यांना उत्कृष्ट कामगिरी करता येण्यासाठी सर्व प्रयत्न केले पाहिजे.

भारताच्या समृद्ध विविधतेच्या आणि सांस्कृतिक मान ठेवत आणि त्याचवेळी देशाच्या स्थानिक व वैच्छिक संदर्भातील गरजा लक्षात घेऊन या सगळ्या गोष्टींचा धोरणात समावेश केला पाहिजे. भारतीय युवकांना भारत देशाविषयी आणि इथल्या विविध सामाजिक, सांस्कृति आणि तांत्रिक गरजांबरोबर येथील अद्वितीय कला, भाषा आणि ज्ञानाच्या पारंपारिकविषयी राष्ट्रीय अभिमान, आत्मविश्वास, आत्मज्ञान, परस्पर सहयोग व एकमेकांसाठी आणि भारताने सतत विकासाच्या पायऱ्या चढण्यासाठी ज्ञान होणे अतिशय आवश्यक आहे.

**२. नविन शैक्षणिक धोरण व आव्हाने :**

तब्बल ३४ वर्षानंतर आपल्या देशात नविन शैक्षणिक धोरण २०२० जाहीर करण्यात आले. इस्त्रोचे माजी प्रमुख के. कस्तुरीरंगन यांच्या अध्यक्षतेखालील समितीने या धोरणाचा मसुदा तयार केला आहे. या शैक्षणिक धोरणातील महत्त्वाच्या गोष्टी कोणत्या ? येणाऱ्या काळात शिक्षण पद्धतीत कोणते आमुलाग्र बदल होणार आहेत याचा मुद्देसुद अभ्यास करणार आहे. जसे की नवीन शैक्षणिक धोरण २०२० अंतर्गत शालेय व उच्च शिक्षणाचा रचनेत अमुलाग्र बदल करण्यात आले आहेत. शिक्षण अभ्यासक्रमांना वेगवेगळ्या शाखांचा चौकटीतून बाहेर काढून आंतरशाखीय आणि समन्वयी करण्यात आले आहे. याचाच सोपा अर्थ असा आहे की आता एकाचवेळी अभियांत्रिकी व संगीत हे दोन्ही विषय घेऊनही उच्च शिक्षण पूर्ण करता येईल. नवीन शैक्षणिक धोरणानुसार शालेय विद्यार्थ्यांसोबत वैज्ञानिक दृष्टीकोन विकसित केला जाणार असून २१व्या शतकासाठी आवश्यक कौशल्ये प्रदान करण्याचा महत्त्व देण्यात आले आहे.

गेल्या वर्षीच्या जुलै महिन्यामध्ये भारताने २१व्या शतकातील पहिले व सर्वात व्यापक शैक्षणिक धोरण जाहीर केले. १९८६ नंतर पहिल्यांदाच असे शैक्षणिक धोरण जाहीर करण्यात आले. या धोरणामध्ये भारताच्या व्यवस्थेला भेडसावणाऱ्या विविध आव्हानांवर उपाय सुचवण्याचा प्रयत्न करण्यात आला. हे नवे शैक्षणिक धोरण जाहीर झाल्याच्या वर्षापूर्तीनिमित्त बोलतांना पंतप्रधान मोदी असे म्हणाले की, आपण स्वातंत्र्याचा ७४ वर्षामध्ये पदार्पण करत आहोत, एका प्रकारे नव्या शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी करणे आता अत्यंत महत्त्वाचे आहे. नवीन भारत आणि भविष्यासाठी तयार युवा पिढी घडवण्याचा दृष्टीने हे धोरण महत्त्वाची भूमिका बजावणार आहे.

हे २१ व्या शतकातील सर्वात दुरदर्शी धोरण आहे असे मत शिक्षणमंत्री धर्मेन्द्र प्रधान यांनी मांडले आहे. याद्वारे प्रत्येक विद्यार्थ्यांना क्षमतांचा योग्य वापर, शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण, क्षमता विकास आणि शिक्षणाच्या माध्यमांमध्ये परिवर्तन घडून येणार

आहे. हे धोरण जाहीर झाल्यापासून गेल्या १६ महिन्यांमध्ये कोरोना महामारीचा सामना करत या धोरणातील काही महत्त्वाचे टप्पे पूर्ण करण्यात आले आहेत. सर्वात महत्त्वाचे म्हणजे नव्या शैक्षणिक धोरणातील ध्येय आणि दृष्टीकोन याबाबत विविध भागधारकांना जागरूकता आणि हितसंबंध निर्माण करण्याच्या दृष्टीने सरकारने चांगली कामगिरी बजावली आहे.

नव्या शैक्षणिक धोरणानुसार शालेय अभ्यासक्रमात कृत्रिम बुद्धिमत्ता आणि आर्थिक बाबींचा समावेश करण्यात आला आहे. नव्या आर्थिक धोरणामध्ये मातृभाषा किंवा प्रादेशिक भाषेला अधिक प्राधान्य देण्यात आले आहे. काही राज्यांमध्ये प्रायोगिक तत्त्वावर हा उपक्रम सुरु करण्यात आला आहे. तसेच शिक्षण मंत्रालयाने बहुचर्चित ॲकडेमिक बँक ऑफ क्रेडिट हा उपक्रम आणला आहे.

**पाच महत्वाची आव्हाने :**

सध्या नव्या शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीने जरी जोर धरलेला असला तरीही ते पूर्वत्त्वाला जाण्याच्या मार्गावर अनंत आव्हाने आहेत. भारताच्या शैक्षणिक क्षेत्रातील विविधता आणि आकार लक्षात घेता या धोरणाची अंमलबजावणी हे एक अवघड काम असणार आहे. उदाहरणासाठी आपण शालेय शिक्षण व्यवस्थेचा विचार करू. १५ लाखाहून अधिक शाळा, २५ करोड विद्यार्थी आणि ८९ लाख शिक्षकांसह भारतातील शिक्षण व्यवस्था ही जगातील दुसऱ्या क्रमांकावरील शिक्षण व्यवस्था आहे.

उच्च शिक्षण व्यवस्थेचा आकारही फार मोठा आहे. एआयएसएचई २०१९ च्या अहवालानुसार भारताच्या उच्च शिक्षण क्षेत्रात जवळपास १००० विद्यापीठे, ३९९३१ महाविद्यालये आणि १०,७२५ स्वायत्त संस्थशश्रशज्ञध्ये मिळून ३.७४ करोड विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. राज्य, जिल्हा तसेच तालुका स्तरावरील सर्व भागधारकांना एकत्र आणून या नव्या शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी करणे अत्यंत कठीण बाब ठरणार आहे. विलक्षण विविधता असलेल्या राज्यांमधील तसेच जिल्हास्तरावरील विविध भागधारकांमध्ये सामायिक जबाबदारी व मालकीची भावना निर्माण करणे हे शिक्षण मंत्रालयासाठी मोठे आव्हान असणार आहे.

दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे नव्या शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी देशांच्या, राज्यांच्या आणि सरकारांच्या क्षमतेवर अवलूंबन आहे. भारताच्या शिक्षण व्यवस्थेमध्ये निधीची कमतरता आहे. संपूर्ण व्यवस्था ही नोकरशाहीवर आधारलेली आहे व नवीन कल्पना आणि वाढीच्या क्षमतेवर शिक्षण व्यवस्थेत प्रतिकूल वातावरण आहे असे के. कस्तुरीरंगन यांच्या अध्यक्षतेखाली मसुदा समितीने निदर्शनास आणून दिले आहे.

नव्या शैक्षणिक धोरणामुळे कल्पना केलेल्या परिवर्तनांचा विशालतेचा चालना देण्यासाठी शिक्षण मंत्रालये (केंद्र आणि राज्य) आणि इतर निमायक संस्थामधील अंतर्गत क्षमता अत्यंत अपूरी आहे. उदाहरणार्थ पारंपारीक शिक्षणाकडून प्रयोगात्मक शिक्षण व टिकात्मक विचारापर्यंत जाण्यासाठी ही शिक्षण व्यवस्था चालवणाऱ्या लोकांच्या व सोबतच शिक्षक, विद्यार्थी व पालकांच्या दृष्टीकोनात बदल होणे गरजेचे आहे.

तिसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे हे धोरण मुख्यत्त्वे केंद्र आणि राज्यांमधील सहकार्यावर अवलंबून असणार आहे. या धोरणाचा मसुदा केंद्र सरकारने राज्य सरकारांसह विविध भागधारकांना योगदानातून तयार केला असला तरी त्याची अंमलबजावणी मुख्यत्वे राज्यांच्या सक्रिय सहकार्यावर अवलंबून आहे, याचे मुख्य कारण म्हणजे बहुतांश सेवांवर आधारीत शैक्षणिक उपक्रम राज्य सरकारांकडून चालवले जाते.

चौथी महत्वाची बाब म्हणजे या धोरणाच्या दृष्टीने खाजगी क्षेत्राची भूमिका महत्वाची ठरणार आहे. भारतातील जवळपास ७० टक्के उच्च शिक्षण देणाऱ्या संस्था या खाजगी आहेत, तसेच एकूण संख्येच्या जवळपास ६० ते ७० टक्के विद्यार्थी खाजगी

संस्थामध्ये उच्च शिक्षण घेत आहेत. खाजगी क्षेत्र आर्थिक संसाधने व नाविन्यपूर्ण कल्पना प्रदान करतात. याकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. या धोरणाच्या प्रक्रियेसाठी खाजगी क्षेत्रात योगदान मिळवणे व यातील एक महत्त्वाची भागीदारी म्हणून खाजगी क्षेत्राच्या योगदानाला मान्यता देणे ही एक महत्त्वाची बाब आहे.

पाचवी महत्त्वाची गोष्ट म्हणजे विविध उपक्रमाच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी येत्या दशकात पुरेल अश्या संसाधनांची गरज लागणार आहे. या संदर्भात या धोरणात म्हटल्याप्रमाणे नव्या धोरणाची उद्दिष्टे साध्य करण्यासाठी देशाला शिक्षणावरील सामाजिक खर्च एकूण देशांतर्गत उत्पन्नाच्या ६ टक्क्यापर्यंत वाढवावा लागेल. भूतकाळात देण्यात आलेली आश्वासने आणि त्याची प्रत्यक्ष पुर्तता यांचा विचार केल्यास हे नक्कीच कठीण काम असणार आहे. उदाहरणार्थ १९६८ च्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामध्ये शिक्षणावरील सार्वजनिक खर्च एकूण देशांतर्गत उत्पन्नाचा ६ टक्क्यापर्यंत नेण्याची शिफारस करण्यात आले आहे. मात्र गेल्या चार दशकांमध्ये शिक्षणावरील सार्वजनिक खर्च ३ टक्क्यांच्या पुढे गेलेला नाही. आश्चर्यकारक बाब म्हणजे शिक्षणावरील खर्च हा सर्वात कमी होता. २०२०-२१ मध्ये शिक्षणावरील खर्च १९३११ कोटींवरून २०२१-२२ मध्ये ९३२२४ कोटी इतका कमी झाला.

कोरोना आणि आर्थिक संकटामुळे सरकारने आरोग्य क्षेत्रात अधिक खर्च करणे पसंत केले. त्यामुळे शिक्षण क्षेत्रात खर्चात कपात झाली याबाबत कोणतेही दुमत नाही. पण येत्या काळात शिक्षणावरील खर्च कसा वाढवता येईल यासाठी कोणतीही योजना सरकारकडे नाही. नवे शैक्षणिक धोरण २०२० हा नक्कीच एक मार्गदर्शक दस्तऐवज आहे.

**३. नविन शैक्षणिक धोरण व उपलब्ध संधी व संसाधने :**

छोट्या शिक्षण संस्था प्रत्यक्ष आदिवासी ग्रामीण भागात काम करीत आहेत. त्यांना शासनाने पायाभूत सुविधांचा पुरवठा यानिमित्त अपेक्षित आहे. इमारत, प्रयोगशाळा, फर्निचर, संशोधन शाळा, कृतीशाळा, त्याला पुरक अशी साधने जर ग्रामिण भागातील विद्यार्थ्यांना उपलब्ध करून दिली तर पुढील काळात या छोट्या शिक्षण संस्था स्वावलंबी युवाशक्ती निर्माण करतील, शिवाय या नवीन शैक्षणिक धोरणाने छोट्या आणि मोठ्या शिक्षण संस्था यांच्यातील भेददेखील संपुष्टात येईल.

नवीन शैक्षणिक धोरणाचा अवलंब झाल्यानंतर आतापर्यंत धसका येणाऱ्या बोर्डाच्या परिक्षांची भिती मुलांमध्ये राहणार नाही, शिवाय विद्यार्थी आणि पालक हे या परीक्षांतून मिळणाऱ्या अवाजवी गुणांच्या अपेक्षांचे भांडवल करून अनेक कोचिंग क्लासेस पैसे उकळण्याचे काम करीत होते. नवीन शैक्षणिक धोरणाने कोचिंग क्लासेसच्या या वृत्तीला लगाम घातला जाणार आहे. त्यामुळे होत असलेली स्पर्धात्मक न राहता सार्वत्रिक गुणवत्तेचा विकास होईल. शिवाय पदविधर शिक्षणात म्हणजे कला, वाणिज्य शास्त्र या तीन घटकांची सांगड आता व्यावसायिक अभ्यासक्रमांशी जोडली जाणार आहे. एखादा इंजिनिअरिंग शिकणारा विद्यार्थी कला क्षेत्रात एखादा अभ्यास पूरक म्हणून घेऊ शकते, आपल्या चाकोरीबद्ध अभ्यासक्रमाचा आणि त्याच्यामुळे होणाऱ्या तोट्यांचा संबंध आता घुसर होणार आहे. या धोरणाने नवीन यांत्रिकी शोध आणि संगणकिय प्रणाली यांची सांगड घातल्याने विचारशक्तीला प्रेरणा मिळणार आहे. या नवीन शैक्षणिक धोरणाने ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या विकासाचा उच्चांक वाढणार आहे.

नव्या शैक्षणिक धोरणात सरकारी शाळांतील प्रशासनात मोठा बदल करण्यात आला आहे. आता कॉम्प्लेक्स किंवा क्लस्टरचा धर्तीवर शाळांचे व्यवस्थापन होईल. हे क्लस्टर शालेय शिक्षण प्रशासनातील मुख्य शाखा असेल. या शालेय कॉम्प्लेक्समध्ये जवळ असलेल्या लहान शाळा संघटनात्मक व प्रशासकिय शाखांच्या स्वरूपात एकत्र असतील. एक माध्यमिक शाळा या रचनेत प्रमुख असेल. या भागातील सर्व सरकारी शाळा केंद्राच्या अंतर्गत येतील, त्यामुळे संसाधनांचे आदानप्रदान करणे सुलभ होईल, एकच व्यवस्थापन असलेल्याने या शाळांत ग्रंथालय, प्रयोगशाळा, सामाजिक कार्यकर्ते, समुपदेशक आणि विशेष

विषयांचे शिक्षक चांगली संसाधने आदान–प्रदान होवू शकेल. याशिवाय देशभरात एक सरकारी आणि एक खासगी शाळा जोडण्याचा उल्लेखही धोरणात आहे. शाळांत मोफत असलेल्या मुलभूत सुविधांचा वापर सामाजिक जागृती केंद्रात स्वरूपात करण्याबाबत उल्लेखही धोरणात आहे.

**ऑनलाईन शिक्षण वाढेल :**

ई–शिक्षणासाठी शिक्षण मंत्रालयात एक विभाग असेल, यातून डिजीटल पायाभूत रचना, यातील कंटेंट आणि क्षमता वाढेल.

**नविन धोरण कधीपासून लागू ? पॅटर्न अचानक बदलला जाईल का ?**

या शैक्षणिक वर्षात पॅटर्न एकदम बदलणार नाही, एका दशकात यात हळूहळू बदल करण्यात येईल, २०२४–२९ मध्ये १२ वी चा पॅटर्न अभ्यासक्रमात दाखल होईल. १० वी नंतर चा पॅटर्न २०२२–२३ मध्ये होईल.

**४. नवीन शैक्षणिक धोरणात लवचिकता, समता सर्व समावेशकता :**

जग हे जागतिक खेडे होत असतांना समाजाच्या उन्नतीसाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार घेऊन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचे आम्ही स्वागत करीत आहोत. पुढची पिढी आत्मनिर्भर भारतासाठी, नवनिर्माणासाठी सज्ज होण्याच्या दिशेने टाकलेले एक पाऊल म्हणजे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० होय. देशात किमान शिक्षणाचा टक्का वाढत असला तरीपण गुणवत्तेबाबतीत काही प्रमाणात प्रश्नचिन्हे आहेत. सुमारे ४०,००० कॉलेज व आठशेपेक्षा जास्त विद्यापिठे आहेत. परंतु विद्यार्थी नाव नोंदणीमध्ये प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षणांच्या तुलनेत उच्च शिक्षणाचे प्रमाण २०१८ मध्ये २६.३ टक्के असून आता नव्या शैक्षणिक धोरणात ते २०३५ साली किमान ५० टक्क्यापर्यंत वाढवण्याचे उद्दिष्ठ ठरलेले आहे. १९८६ च्या शैक्षणिक धोरणातील अनेक मुद्दे मागील ३४ वर्षात पूर्ण न होऊ शकले, त्यांचे पुनरावलोकन करून ज्या बाबी अपूर्ण आहेत त्यात काही सुधारणा करण्यात संधी आहेत. याकडे लक्ष देण्यात आले.

त्याचबरोबर महिलांच्या शिक्षणासाठी विशेष लक्ष, व्यावसायीक शिक्षणाची आवश्यकता या मुद्यांचाहही विचार नवीन शैक्षणिक धोरणात केलेला आहे. गरीब व श्रीमंत शिक्षणातील विषमता ही नवीन शैक्षणिक धोरणात विचारात घेतली आहे, म्हणून सरकारी आणि खाजगी शाळामध्ये शिक्षणात समानता आणण्याची भूमिका प्रामुख्याने मांडण्यात आली आहे, राष्ट्रीय शिक्षण आयोगाची स्थापना करण्याची आणि खासगी शाळांना अभियांत्रिक फी वाढविण्यापासून रोखण्याची शिफारस नवीन शैक्षणिक धोरणात करण्यात आलेली आहे.

**५. नवीन शैक्षणिक धोरण एका यथायोग्य व कौशल्यावर आधारित शिक्षण प्रणाली :**

विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणासोबतच कौशल्यविकास व त्याद्वारा त्यांच्या रोजगाराला चालना मिळावी या उद्देशाने शैक्षणिक धोरणात विशेष भर दिलेला दिसून येतो. यासाठी शैक्षणिक संस्थानातून विद्यार्थी–उमेदवार आणि औद्योगिक क्षेत्रात सक्रिय समन्वय साक्षरता येणार आहे. यासाठी शैक्षणिक कालावधीत उद्योग–व्यवसायाच्या गरजानुरूप जोड देणे, शिक्षणाचाच एक भाग म्हणून उमेदवारी प्रशिक्षणाची जोड दिली. परिणामी विद्यार्थ्यांना त्यांच्या शिक्षणाच्या दरम्यान त्यांच्याशी निगडित कौशल्यविकासासाठी प्राथमिक स्वरूपात का होईना पण प्रत्यक्ष सराव संधी उपलब्ध होणार आहे, त्याच दरम्यान, औद्योगिक आस्थापनांना त्यांच्या प्रचलित व प्रस्तापित गरजानुरूप विद्यार्थ्यांना उमेदवारी स्तरावर कौशल्यविकास प्रशिक्षण दिल्यामुळे कुशल कर्मचारी या योजनांद्वारे मिळू शकतील, हे यासंदर्भात उल्लेखनीय आहे.

नव्या शैक्षणिक पद्धती धोरणात्मक स्वरपात उद्योगांसाठी आवश्यक अशा मुलभूत सुविधा ज्ञान–तंत्रज्ञान संसाधन इत्यादीची ओढ दिली जाणार आहे. हा बदल केवळ शैक्षणिक संदर्भातच नव्हे तर गुणात्मक संदर्भात महत्वाचा ठरणार आहे. यामध्ये विद्यार्थ्यांचा खऱ्या अर्थाने विकास साधण्यासाठी शैक्षणिक संस्थाची वास्तू इत्यादी प्रयोगशाळा, ग्रंथालय, शिक्षक, प्राध्यापकांचे विशेष प्रशिक्षण, विद्यार्थ्यांचे विविध प्रकारे मार्गदर्शन प्रबोधन, संस्था स्तरावर अद्ययावत व संगणकिय पद्धतीची साथ तसेच व्यवसायावर व क्रीडा कौशल्यांवर समावेश करण्यात येणार आहे.

**६. नवीन शैक्षणिक धोरण जाणीवा व जागरूकता :**

१९६८ आणि त्यानंतर १९८६ च्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी ३५ वर्षानंतर आजही पूर्णपणे होऊ शकलेली नाही. गुणवत्तापूर्ण, सर्वांसाठी समान व व्यावसायीक कौशल्यविकास शिक्षण तसेच राष्ट्रीय विकासासाठी सक्षम चारित्र्यसंपन्न पिढी निर्माण करणारी शिक्षणाची उद्दिष्टे ही आजवर साध्य होवू शकलेली नाहीत. आता या नवीन धोरणानुसार प्रचलित शिक्षण व्यवस्थेत बदल करून ही उद्दिष्टे साध्य करणे अपेक्षित आहे.

शिक्षणाची सहज उपलब्धता, प्रत्येक घटकाचे उत्तरदायित्व, परवडणारे शिक्षण, शैक्षणिक समानता, शिक्षणाचा दर्जा या पाच स्तंभावर भविष्यातील शैक्षणिक वाटचाल होणार आहे. या धोरणाचे उद्दिष्ट म्हणजे प्रचलित शैक्षणिक व्यवस्थेत बदल करून प्रत्येकाला शिक्षण उपलब्ध करून देणे होय.

कोणत्याही देशातील उत्तम दर्जाचे मनुष्यबळ हे तेथील शाळांच्या वर्गखोल्यांमध्ये तयार होते, त्यामुळे देशाचे भवितव्य घडविण्यास शिक्षकांची भूमिका खूप मोलाची आणि महत्त्वाची ठरते. शिक्षणाचे धोरण बनवितांना शिक्षणापुढील विविध प्रश्न कलानुरूप आव्हाने यांचा सर्वकच विचार करून भावी काळासाठी दिशादर्शक कालबद्ध कार्यक्रम सुचविण्यात येतो. मात्र या धोरणांची अंमलबजावणी करणारा सर्वात महत्त्वाचा व जबाबदार घटक या नात्याने शिक्षकांनी याबाबत अधिक संवेदनशील व जबाबदार असणे उपेक्षीत आहे. शिक्षक दिनाच्या निमित्ताने नवीन शैक्षणिक धोरणात बदलत्या भूमिकेचा विचार करणे औचित्त्याचे ठरले.

**७. नवीन शैक्षणिक धोरण जागतिक शिक्षण प्रणाली :**

**शालेय शिक्षण प्रणाली :**

- २०३० पर्यंत शालेय शिक्षणात १००% जीईआर सह शालेय पूर्व ते माध्यमिक स्तरापर्यंत शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण करण्याचा नव्या धोरणाचा उद्देश.
- राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० मुळे २ कोटी शाळा बाह्य मुले मुख्य प्रवाहात परतली.
- किमान पाचवीपर्यंत शिक्षण मातृभाषा / प्रादेशीक भाषेत. कुठल्याही विद्यार्थ्यांना कोणतीही भाषा लादली जाणार नाही.
- समग्र प्रगती पुस्तकासह मुल्यांकन सुधारणा, शिक्षणाचे फलित साध्य करण्याबाबत विद्यार्थ्यांचा प्रगतीचा आढावा घेण्यात येणार.
- १०+२ या शालेय अभ्यासक्रम आकृती बंधाची जागा आता ५+३+३+४ अभ्यासक्रम आराखडा अनुक्रमे ३–८, ८–११, ११–१४, १४–१८ वयोगटात राहील. यामुळे ३–६ वर्षे हा आतापर्यंत समाविष्ठ न झालेला वयोगट शालेय अभ्यासक्रमाला अंतर्गत येईल. जगभरात हा वयोगट बालकाच्या मानसिक जडणघडणीच्या विकासासाठी अतिशय महत्त्वाचा मानला जातो. नव्या पद्धतीचा तीन वर्षे अंगणवाडी / शाळा पूर्वसह १२ वर्षे शाळा राहणार आहे.

- पायाभूत साक्षरता आणि सांख्यीकी यावर भर व्यावसायीक आणि शैक्षणिक शाखा यांच्यात कुठल्याही प्रकारचे कठोर विभाजन असणार नाही. शाळामध्ये शालेय शिक्षण ६ वी पासून सुरू होईल आणि त्यात इंटर्नशिपचा समावेश असेल.

**उच्च शिक्षण प्रणाली :**

- २०३५ पर्यंत जीईआर ५०% पर्यंत वाढवणे, उच्च शिक्षण संस्थामध्ये ३.५ कोटी नवीन जागा वाढवण्यात येतील.
- या धोरणात व्यापक आधारभूत बहू–शाखीय लवचिक अभ्यासक्रम सर्वसमावेशक पदवी शिक्षण अभ्यासक्रम, विषयांचे सर्जनशिल संयोजन व्यवसायीक शिक्षणाचे एकात्मीकरण आणि योग्य प्रमाणीकरणासह बहू प्रवेश आणि निर्णय टप्प्यांची कल्पना केली आहे. पदवी शिक्षण ३ किंवा ४ वर्षांचे असू शकते आणि या कालावधीत अनेक निर्गमन पर्याय आणि योग्य प्रमाणीकरता असू शकते.
- ॲकडमीक बँक ऑफ क्रेडीटची स्थापना केली जाईल जेणेकरून हस्तांतरित करता येईल.
- बहुशाखीय शिक्षण आणि संशोधन विद्यापिठांची स्थापना एमईआरयू, आयआयटी, आयआयएसच्या तोडीचे देशातील जागतिक दर्जाचा सर्वोकृष्ठ बहुशाखीय शिक्षणसाठी आदर्शवाद म्हणून स्थापित केले जातील.
- नॅशनल रिसर्च फाऊंडेशनची स्थापना केली जाणार या सर्वोच्च संस्थेचा माध्यमातून प्रबळ संशोधन संस्कृति आणि उच्च शिक्षणाचे संशोधन क्षमता वृद्धींगत करण्यात येईल.

**इतर :**

- महाविद्यालयांची संलग्नता १५ वर्षात टप्याटप्याने तयार केली जाणार आहे आणि महाविद्यालयांना पातळी–आधारीत यंत्रणेचा माध्यमातून श्रेणीबद्ध स्वायतत्ता देण्यात येईल.

**८. नवीन व जुने शैक्षणिक धोरण एक तुलनात्मक अभ्यास :**

- १९६८ च्या धोरणाच्या तुलनेत १९८६ च्या धोरणाने चांगली कामगिरी केली, याची अनेक कारणे होती. सर्वप्रथम हे धोरण १९७६ मध्ये ४२ व्या घटना दुरूस्तीनंतर आले.
- या दुरूस्तीमध्ये शिक्षण, वने, वजन आणि मापे, वन्य प्राणी आणि पक्ष्यांचे संरक्षण आणि न्याय प्रशासन यासह पाच विषय राज्यातून समवर्ती यादीमध्ये हस्तांतरीत करण्यात आले.
- दुसरे म्हणजे आता केंद्र व्यापक जबाबदारी स्विकारण्यास सक्षम आहे आणि या धोरणाच्या अनुषंगाने अनेक कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहे.
- पि.व्ही. नरसिंहराव सरकारने १९९२ मध्ये १९८६ च्या राष्ट्रीय धोरणात बदल केले. नवीन विशेष शाळा उघडण्यासाठी आणि विद्यार्थ्यांना व्यावसायीक प्रशिक्षण देण्यासाठी स्वयंसेवी संस्थानी या क्षेत्रात पुढे येण्यासाठी तरतुद केल्या होत्या.
- प्रत्येक राज्यात किमान एक मुक्त विद्यापिठ उघडण्याची तरतुद करण्यात आली होती. आणि त्यांचे नियमन करण्यासाठी IGNOO ला तांत्रिक सहाय्य आणि दुरस्थ शिक्षण परिषद घ्यावी लागते.

तसेच नवीन शैक्षणिक धोरणात केंद्रीय मंत्री मंडळाने राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (NEP) २०२० ला मंजूरी दिली आहे ज्याचा उद्देश भारतीय शिक्षण व्यवस्थेत शाळा ते महाविद्यालयस्तरीय अनेक बदलांचा परिचय करून दिला आहे.

- NEP २०२० चे उद्धिष्ट भारताला जागतिक ज्ञान महासत्ता बनवणे आहे.

- मनुष्यबळ विकास मंत्रालयाने नाव बदलून शिक्षण मंत्रालय करण्यासही मंत्रीमंडळाने मंजुरी दिली आहे.

तुलना करायची म्हटल्यास आधी पेक्षा खूप काही सोपं झालं आहे. सगळ्यांना शिक्षणाचा अधिकार मिळत आहे. कोणी शिक्षणापासून वंचित नाही आहे, कोणी दुर्बल नाही, खुप काही सोयी सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या त्यामुळे शिकणे ही काळाची गरज आहे – 'शिकाल तर शिकाल'.

**नवीन शैक्षणिक धोरणातील क्रीडा व शारीरिक शिक्षण याचा समावेश हा व्यक्तिमत्व विकासाचे प्रभावी माध्यम ठरु शकते :**

राज्य शासनाच्या शिक्षण प्रणालीमध्ये खेळ, शारीरिक शिक्षण, युवक कल्याण या बाबींचा समावेश होऊन क्रीडा कलेची परंपरा जोपासण्यासाठी क्रीडा क्षेत्रात वारसा लाभलेल्या महाराष्ट्राने शिक्षण प्रणालीत बदल करून जुलै १९७० मध्ये स्वतंत्र क्रीडा युवक सेवा संचालनालयाची स्थापना केली व शासनाच्या योजनांची प्रभावी अंमलबजावणी होण्यासाठी राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालये निर्माण केली कारण शिक्षणाबरोबर खेळही तेवढेच महत्वाचे आहे. शिक्षणाने आपण साक्षर होतो तर क्रीडा व शारीरिक शिक्षण याने आपला व्यक्तिमत्व विकास होतो.

**कु. वैष्णवी आगलावे**
बी.एस्सी. भाग–१

# प्रवास

प्रवास म्हणजे नुस्ता स्थानांतरण नसून,
स्वप्नांची दारे उघडण्याचे ठेवलेले साधनच आहे जसे लपून...
एक प्रवास म्हणजे तो बालपणींचा,
लालपरी पाहून मामाच्या घरच्या येणाऱ्या आठवणींचा
एक प्रवास तो परत न मिळणाऱ्या आनंदाचा,
जिवलगांसोबत रोज-रोज शाळेत जान्यांचा
एक प्रवास तो घाबरणाऱ्या मुलीचा,
सुखरूप परत येणार का ? या विचाराचा !...
एक प्रवास तो संघर्षाचा,
स्वप्नांसाठी घर सोडून जाण्याचा
एक प्रवास त्या अनोळखी व्यक्तीसोबतचा,
काही मिनिटातच होणाऱ्या अनोख्या मैत्रीचा
एक प्रवास तो वृद्धपणाचा सर्व गोष्टींचे अनुभव
असुन, शेवट कसा होणार या विचाराचा
असा हा एक अद्वितीय प्रयास आयुष्याचा
जन्मापासून तर मृत्यूपर्यंतचा....

**शिवराज ठाकरे**
बी.एस्सी. भाग–२

# राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० : व्यक्तिमत्व विकासाची नांदी

उपविषय : नवीन शैक्षणिक धोरणातील क्रीडा व शारीरिक शिक्षण यांचा समावेश हा व्यक्तिमत्व विकासाचे प्रभावी माध्यम ठरू शकते.

विद्या नाम–नरस्य रूपमधिकं प्रच्छन्नगुप्तं धनम्,
विद्या भोगकरी यश: सुखकरी विद्या गुरूणां गुरू: ।
विद्या बन्धुजनो विदेशगमने विद्या परं दैवतम्,
विद्या राजसु पूज्यते न हि धनं विद्याविहीन: पशु: ॥

वरील सुभाषितामध्ये सुभाषितकाराने आपल्याला विद्येचे महत्त्व पटवून दिले आहे. वास्तविक पाहता विद्यार्जन अथवा शिक्षण ही एक निरंतर चालणारी प्रक्रिया आहे. असे असले तरी उपजीविकेसाठी लागणारे विटांचे मुलभूत ज्ञान असण्याकरिता एक साचेबद्ध शिक्षणपद्धती असणे अनिवार्य आहे. एक सुशिक्षित राष्ट्रच स्वत:चा विकास करू शकते व प्रतिकूल परिस्थितीत आपले अस्तित्व टिकवून ठेवू शकते. याकरिता प्रत्येक राष्ट्राने आपल्या नागरिकांना सुशिक्षित करण्यासाठी त्यांचे शैक्षणिक धोरण निश्चित केले आहे. भारतही याला अपवाद नाही ! गेल्या सत्तर वर्षांचा आढावा घेता आपल्या येथील शिक्षण पद्धतीमुळे आपण इतर राष्ट्रांच्या तुलनेत चांगलाच विकास केला आहे असं लक्षात येईल. आणि आजच्या लेखाचा मुख्य विषय असलेल्या २०२० चे शैक्षणिक धोरण पाहता पुढील दहा वर्षांत आपला देश अधिकाधिक प्रगतीची शिखरे पद्क्रांत करेल यात शंका नाही.

आपल्या मूळ विषयाकडे वळण्यापूर्वी नवीन शैक्षणिक धोरण नक्की काय आहे हे थोडक्यात समजावून घेऊ या. विविध समाज माध्यमांमधून वृत्तवाहिन्यांमधून आणि वृत्तपत्रांमधून आपल्या शिक्षण पद्धती मधे ३४ वर्षांनी बदल केला आहे. असं आपण ऐकलं असेल, वाचलं असेल, पण अशा प्रकारचा बदल हा ७० वर्षांनंतर केला आहे हे अधोरेखित करायला हवं. पूर्वीच्या शैक्षणिक धोरणांचा अभ्यास करता, शाखाभेद नष्ट होणे, वयोमर्यादा कमी करणे, मातृभाषेतील शिक्षणावर जोर देणे, दहावी बोर्ड आणि एम.फिल. सारख्या परीक्षा रद्द करून 'मार्क्स'वादी विचारसरणी बदलणे, क्रीडा व कला यांना महत्व देऊन मुलांच्या व्यक्तिमत्व विकासाकडे त्यांच्या अभिरूचीकडे लक्ष केंद्रित करणे हे गेल्या सत्तर वर्षांत पहिल्यांदाच घडते आहे.

माझ्या मतानुसार हे धोरण मुलांच्या अंगी असलेल्या कला गुणांना वाव देणारे तसेच पुस्तकी ज्ञानाबरोबरच 'जगण्याचे' ज्ञान देणारे ठरणार आहे. याचे कारण म्हणजे दुर्दैवाने क्रीडा, कला आणि शारीरिक शिक्षण यांसारख्या महत्वाच्या गोष्टी ज्या गेली सत्तर वर्षे दुर्लक्षित होत्या त्या आता राबवणे बंधनकारक असणार आहे. तुम्हाला जर शारीरिक शिक्षणाच्या वर्गातील किंवा क्रीडेच्या तासातील स्मृती जागृत करायला सांगितल्या तर बहुधा तो तास/वर्ग कुठल्यातरी अन्य विषयाच्या शिक्षकाने 'अतिरिक्त तास' म्हणून घेतलेला आठवत असेल. कारण जरी शालेय वेळापत्रकात हे तास अधिकृतपणे नमूद केले असले तरी शिक्षण पद्धतीत त्यांना महत्व नसल्याने ते वेळा पत्रक फार कमी विद्यालयांमध्ये राबवले गेले. अर्थात याला अपवाद आहेतच हे मी मान्य करते. परंतु या शैक्षणिक धोरणामुळे शिक्षकांना क्रीडेचा तास हा मुलांना खेळण्यासाठी देणे क्रमप्राप्त आहे व हा बदल अतिशय स्तुत्य आहे.

क्रीडा व शारीरिक शिक्षणामुळे विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्व विकसित व्हायला कशी मदत होईल याविषयी सदर लेखात आपण चर्चा करत आहोत, परंतु व्यक्तिमत्व विकास म्हणजे नक्की काय ? आणि व्यक्तिमत्व विकास नक्की कशा पद्धतीने होतो हे आधी समजून घेऊया. याविषयी मी काही बोलण्यापेक्षा स्वामी विवेकानंद काय म्हणतात हे इथे उद्‌धृत करते. व्यक्तिमत्व विकासाविषयी बोलताना स्वामीजी म्हणतात की ''सर्व शिक्षणाचा हेतू माणसाचे व्यक्तिमत्त्व घडवणे हाच असायला पाहिजे. पण त्याऐवजी आपण बाहेरच्या बाजूलाच रंगसफेदी करण्यात गढून गेलो आहेत.'' म्हणजे व्यक्तिमत्व विकास हा व्यक्तिसापेक्षा आहे व तो बाह्य गोष्टींवर

अवलंबून न राहता आंतरिक गोष्टींवर अवलंबून असतो. मग कुठल्या आंतरिक गोष्टी ? तर याचे उत्तर सुद्धा स्वामीजीच देतात. ''आत्मविश्वास आणि सकारात्मक विचार'' हे ते गुण आहेत. आणि जर नीट विचार केला तर खेळल्यामुळे, व्यायाम केल्यामुळे व्यक्तिमत्वात काय बदल होतो ? तर आत्मविश्वास वाढतो, खिलाडूवृत्ती निर्माण होते, संघासोबत काम कसे करावे, संघ कसा धरून ठेवावा याचे ज्ञान होते, शरीर सुदृढ राहते, निरोगी राहते व याचेच फलस्वरूप म्हणजे आपले मन निरोगी आणि सुदृढ राहते. खरंतर मला 'हेन्स प्रुव्ह' लिहावंस वाटतेय. कारण आपलं गणित विवेकानंदांनी सोडवलंय.

खेळल्यामुळे वर उल्लेख केलेल्या या सर्व गोष्टी आपल्या व्यक्तिमत्त्वाचा एक भाग बनतात आणि त्याचा अपाल्या कामात किती उपयोग होतो हे कुठलाही मनोविकारतज्ञ सांगू शकेल. आज मुलांमध्ये जी एकाग्रता कमी पडतेय, 'स्पर्धा' करण्याची वृत्ती बळावतेय, थोड्याशा अपयशाने नैराश्य येतंय, सहकार्य हा शब्दच त्यांच्या शब्दकोशातून नाहिसा होत चाललाय अशावेळी धोरणातील या बदलामुळे ही परिस्थिती नक्कीच बदलेल अशी आशा आहे.

सतत बैठे खेळ, व्हर्चुअल खेळ खेळल्यामुळे व्यायाम होत नाही व मुलांना लठ्ठपणा, पिसीओडी सारख्या आजारांना अल्पवयात तोंड द्यावे लागते. व्यायाम आपल्या जीवनात एक अविभाज्य भाग आहे. जसं श्वास घेणे, खाणे–पिणे आपल्या शरीराला गरजेचे आहे, तसाच व्यायाम सुद्धा निरोगी आयुष्यासाठी गरजेचा आहे. आधीचे धोरण 'शक्ती' सोडून 'युक्ती' वर लक्ष केंद्रित करायचे पण व्यक्तित्व विकासासाठी, शक्ती आणि युक्ती दोन्ही आवश्यक आहेत. समर्थ म्हणतात,

'शक्तीने मिळते राज्य, युक्तीने यत्न होतसे ।
शक्ती युक्ती ज्याचे ठायी । तेथे श्रीमंती नांदती ॥'

येथे श्रीमंती हा शब्द केवळ धनासंबंधी आलेला नाही. वैचारिक श्रीमंती, आरोग्याची श्रीमंती हे सगळे अभिप्रेत आहे. व्यक्तिमत्वाचा विकास केवळ अभ्यास केल्याने होत नाही. किंबहुना मी असे म्हणेन की अभ्यास केल्याने व्यक्तिमत्व विकास होतंच नाही कारण सर्वांगाने विकास व्हायला हवा. एकट्या मेंदूचा विकास होऊन भागणार नाही. म्हणून मला वाटते की नवीन शैक्षणिक धोरणातील क्रीडा व शारीरिक शिक्षण यांचा समावेश व्यक्तिमत्व विकासाचे प्रभावी माध्यम ठरू शकते.

**कु. मृण्मयी गालफाडे**
बी.एस्सी. भाग–१

# घर

घर म्हणजे सुख
वेगवेगळ्या विचारांचे मुख
घर म्हणजे बापाचा प्रेमळ
धीटपणा
आणि स्वर्गासमसुख
आजीच्या कुशीतील
उबदारपणा
घर म्हणजे मायेचा न
संपणारा ओलावा
आणि बहिण भावाच्या
अनोख्या प्रेमाचा मेळावा
घर म्हणजे आधार
घर म्हणजे सर्व गोष्टीचा
उपचार
घर म्हणजे अशी वास्तू
जे सोडताना डोळ्यात
येतात हमखास अश्रू

**शिवराज ठाकरे**
बी.एस्सी. भाग–२

# शिक्षणाचे आंतरराष्ट्रीयीकरण

- व्यावसायिक शिक्षण हा उच्च शिक्षण व्यवस्थेचा अविभाज्य भाग असेल. स्टँड–अलोन टेक्निकल युनिर्व्हसिटी, हेल्थ सायन्स युनिर्व्हसिटी, लॉ आणि ॲग्रिकल्चरल युनिर्व्हसिटी किंवा या किंवा इतर क्षेत्रातील संस्था बहु–विषय संस्था बनण्याचे उद्दिष्ट ठेवतील.
- शिक्षक शिक्षण–४ वर्षांचे एकात्मिक स्टेज–विशिष्ट, विषय–विशिष्ट बॅचलर ऑफ एज्युकेशन.
- मार्गदर्शनासाठी राष्ट्रीय मिशनची स्थापना करणे.
- नॅशनल एज्युकेशन टेक्नॉलॉजी फोरम (NETF) या स्वायत्त संस्थेची निर्मिती, शिक्षण, मूल्यमापन, नियोजन आणि प्रशासन वाढवण्यासाठी तंत्रज्ञानाच्या वापराबाबत विचारांची मुक्त देवाणघेवाण करण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध करून देणे. शिक्षणाच्या सर्व स्तरांमध्ये तंत्रज्ञानाचे योग्य एकत्रीकरण.
- १००% तरूण आणि प्रौढ साक्षरता प्राप्त करणे.
- चेक आणि बॅलन्ससह अनेक यंत्रणा उच्च शिक्षणाच्या व्यापारीकरणाचा मुकाबला करतील आणि थांबवतील.
- सर्व शैक्षणिक संस्था 'ना–नफा' संस्थांप्रमाणेच लेखापरीक्षण आणि प्रकटीकरणाच्या मानकांनुसार ठेवल्या जातील.
- केंद्र आणि राज्ये मिळून शिक्षणात सार्वजनिक गुंतवणूक वाढवून जीडीपीच्या ६% पर्यंत पोहोचवतील.
- दर्जेदार शिक्षणावर एकंदर लक्ष केंद्रित करण्यासाठी समन्वय सुनिश्चित करण्यासाठी केंद्रीय शिक्षण सल्लागार मंडळाचे बळकटीकरण.
- NEP २०२० चे उद्दिष्ट २०३० पर्यंत प्रीस्कूल ते माध्यमिक स्तरापर्यंत GER १००% पर्यंत वाढवणे, तर व्यायसायिक शिक्षणासह उच्च शिक्षणातील GER २६.३% (२०१८) वरून २०३५ पर्यंत ५०% पर्यंत वाढवणे.
- केंद्रीय क्षेत्र योजना पंडित मदन मोहन मालवीय नॅशनल मिशन ऑन टीचर्स अँड टिचिंग (PMMMNMTT) २०१४ मध्ये शिक्षणक प्रशिक्षण/क्षमता निर्माण आणि शिक्षकांच्या व्यावसायिक विकासाशी संबंधित सर्व समस्यांचे निराकरण करण्यासाठी सुरु करण्यात आली. या घटकांतर्गत देशभरात एकूण ९५ केंद्रे स्थापन करण्यात आली असून त्याद्वारे प्राध्यापक / शिक्षकांना प्रशिक्षण देण्यात आले आहे. सध्या स्थायी वित्त समितिने या योजनेचे मूल्यमापन केले असून, एकूण रू. २०२५–२०२६ पर्यंत चालू ठेवण्याची शिफारस केली जाते. ४९३.६८ कोटी शैक्षणिक संस्थांकडून मिळालेले प्रस्ताव, त्यांची स्क्रीनिंग समितीने केलेली छाननी आणि प्रकल्प मंजुरी मंडळाच्या मंजुरीच्या आधारे PMMMNMTT योजनेअंतर्गत केंद्रांची स्थापना केली जाते.

**शिवराज ठाकरे**
बी.एस्सी. भाग–१

# नॅशनल एज्युकेशन पॉलिसी अंतर्गत बहुविद्याशाखीय शिक्षण

या धोरणामध्ये व्यापक–आधारित, बहु–अनुशासनात्मक, लवचिक अभ्यासक्रम, विषयांचे क्रियाशील संयोजन, व्यावसायिक शिक्षणाचे एकत्रीकरण आणि योग्य प्रमाणीकरणासह अनेक प्रवेश आणि निर्गमन बिंदूसह सर्वसमावेशक पदवी शिक्षणाची कल्पना केली आहे. यूजी एज्युकेशन ३ किंवा ४ वर्षांच्या कालावधीचे असू शकते, ज्यामध्ये एकापेक्षा जास्त एक्झिट पर्याय आणि योग्य प्रमाणपत्र असू शकते. उदाहरणार्थ, १ वर्षानंतर प्रमाणपत्र, २ वर्षानंतर प्रगत डिप्लोमा, ३ वर्षांनी बॅचलर पदवी आणि ४ वर्षांनी संशोधनासह बॅचलर.

वेगवेगळ्या HEI मधून मिळवलेली शैक्षणिक क्रेडिट डिजिटली साठवण्यासाठी एक शैक्षणिक बँक ऑफ क्रेडिटची स्थापना केली जाईल, जेणेकरून ते हस्तांतरित केले जाऊ शकतील आणि मिळवलेल्या अंतिम पदवीमध्ये मोजले जातील. IITs आणि IIM सह बहु–विद्याशाखीय शिक्षण आणि संशोधन विद्यापीठे (MERUs) देशातील सर्वोत्तम जागतिक दर्जाच्या बहु–विद्याशाखीय शिक्षणाचे मॉडेल म्हणून स्थापन केली जातील. मजबूत संशोधन संस्कृती वाढवण्यासाठी आणि उच्च शिक्षणात संशोधन क्षमता निर्माण करण्यासाठी राष्ट्रीय संशोधन प्रतिष्ठानची सर्वोच्च संस्थान म्हणून स्थापना केली जाईल.

**१. नॅशनल एजुकेशन पॉलिसी अंतर्गत नियमन पद्धत**

भारतीय उच्च शिक्षण आयोग (HECI) ही वैद्यकीय आणि कायदेशीर शिक्षण वगळता सर्व उच्च शिक्षणासाठी एकच व्यापक संस्था म्हणून स्थापन केली जाईल. HECI कडे चार स्वतंत्र अनुलंब असतील – नियमनासाठी राष्ट्रीय उच्च शिक्षण नियामक परिषद (NHERC), मानक सेटिंगसाठी सामान्य शिक्षण परिषद (GEC) निधीसाठी उच्च शिक्षण अनुदान परिषद (HEGC) आणि मान्यतासाठी राष्ट्रीय मान्यता परिषद (NAC). HECI तंत्रज्ञानाद्वारे चेहराविरहित हस्तक्षेपाद्वारे कार्य करेल, आणि जे HECI नियम आणि मानकांचे पालन करणार नाहीत त्यांना दंड करण्याचे अधिकार असतील. सार्वजनिक आणि खाजगी उच्च शिक्षण संस्था नियमन, मान्यता आणि शैक्षणिक मानकांसाठी सामान्य मानकांनुसार नियंत्रित केल्या जातील.

**२. तर्कसंगत संस्थात्मक आर्किटेक्चर**

उच्च शिक्षणाच्या संस्थांचे रूपांतर मोठ्या, सुसंस्कारित, प्रसिद्ध बहुविद्याशाखीय संस्थांमध्ये केले जाईल ते उच्च दर्जाचे शिक्षण, संशोधन आणि समुदाय सहभाग प्रदान करतील. विद्यापीठाची व्याख्या संशोधन देणारं विद्यापीठांपासून ते अध्यापन–केंद्रित विद्यापीठे आणि स्वायत्त पदवी–अनुदान महाविद्यालयांपर्यंतच्या संस्थांच्या स्पेक्ट्रमला अनुमती देईल. १५ वर्षांमध्ये महाविद्यालयांची संलग्नता टप्प्याटप्प्याने बंद केली जाईल आणि महाविद्यालयांना स्वायत्ततेची पदवी देण्यासाठी टप्प्याटप्प्याने यंत्रणा उभारली जाईल. कालांतराने, प्रत्येक महाविद्यालय एकतर स्वायत्त पदवी देणारे महाविद्यालय किंवा विद्यापीठाचे घटक महाविद्यालय म्हणून विकसित होण्याची संकल्पना केली जाते.

**३. प्रेरित, उत्साही आणि सक्षम शिक्षक**

NEP स्पष्टपणे परिभाषित, स्वतंत्र, पारदर्शक भरती, अभ्यासक्रम/अध्यापनशास्त्र डिझाइन करण्याचे स्वातंत्र्य, उत्कृष्टतेला चालना देणे, शिक्षकांना संघटनात्मक नेतृत्वात जाण्यासाठी प्रेरणा देणारे, उत्साही आणि सक्षम बनविण्यासाठी शिफारस करते. मूलभूत नियमांचे पालन न करणाऱ्या प्राध्यापकांना जबाबदार धरले जाईल.

**४. शिक्षकांचे शिक्षण**

शिक्षक शिक्षणासाठी एक नवीन आणि सर्वसमावेशक राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा, NCFTE 2021, NCTE द्वारे NCERT सोबत सल्लामसलत करून तयार केला जाईल. २०३० पर्यंत अध्यापनासाठी किमान पदवी पात्रता ४ वर्षांची एकात्मिक बीएड असेल. कमी दर्जाच्या शिक्षक शिक्षण संस्थांवर (TEI) कडक कारवाई केली जाईल.

**५. मार्गदर्शन मिशन**

भारतीय भाषांमध्ये शिकवण्याची क्षमता असलेल्यांसह – उत्कृष्ट वरिष्ठ / निवृत्त प्राध्यापकांच्या मोठ्या समूहासह मार्गदर्शनासाठी राष्ट्रीय मिशन स्थापन केले जाईल – जे विद्यापीठ / कॉलेजला अल्प आणि दीर्घकालीन मार्गदर्शन / व्यावसायिक सहाय्य प्रदान करण्यास इच्छुक असतील.

**६. विद्यार्थ्यांना आर्थिक सहाय्य**

SC, ST, OBC आणि इतर SEDG मधील विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेला प्रोत्साहन देण्यासाठी प्रयत्न केले जातील. शिष्यवृत्ती प्राप्त करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या प्रगतीचा पाठपुरावा, पालनपोषण आणि मागोवा घेण्यासाठी राष्ट्रीय शिष्यवृत्ती पोर्टलचा विस्तार केला जाईल. खाजगी HEI ला त्यांच्या विद्यार्थ्यांना मोठ्या संख्येने फ्री–शिप आणि शिष्यवृत्ती ऑफर करण्यासाठी प्रोत्साहित केले जाईल.

**७. मुक्त आणि दूरस्थ शिक्षण**

GER वाढवण्यात महत्त्वाची भूमिका बजावण्यासाठी याचा विस्तार केला जाईल. ऑनलाइन कोर्सेस आणि डिजिटल रिपॉझिटरीज, संशोधनासाठी निधी, सुधारित विद्यार्थी सेवा, MOOCs ची क्रेडिट आधारित मान्यता इ. यासारख्या उपाययोजना, ते उच्च दर्जाच्या इन–क्लास प्रोग्राम्सच्या बरोबरीने असल्याची खात्री करण्यासाठी घेतले जातील.

**८. ऑनलाईन शिक्षण आणि डिजिटल शिक्षण**

ज्यावेळी आणि जेथे–जेथे पारंपारिक आणि वैयक्तिक शिक्षण पद्धती शक्य नसेल, तेथे गुणवत्तापूर्ण शिक्षणाच्या पर्यायी पद्धसींसह सज्जता सुनिश्चित करण्यासाठी महामारी आणि साथीच्या रोगांच्या अलीकडील वाढीमुळे ऑनलाईन शिक्षणास प्रोत्साहन देण्यासाठी सर्वसमावेशक शिफारसींचा समावेश करण्यात आला आहे. शालेय आणि उच्च शिक्षण या दोन्हीच्या ई–शिक्षणाच्या गरजा पूर्ण करण्यासाठी MHRD मध्ये डिजिटल पायाभूत सुविधा, डिजिटल सामग्री आणि क्षमता वाढवण्याच्या उद्देशाने एक समर्पित युनिट तयार केले जाईल.

**९. NEP 2020 : शिक्षणात तंत्रज्ञान**

एक स्वायत्त संस्था, नॅशनल एज्युकेशन टेक्नॉलॉजी फोरम (NETF), शिक्षण, मूल्यांकन, नियोजन, प्रशासन वाढविण्यासाठी तंत्रज्ञानाच्या वापरावर विचारांच्या मुक्त देवाणघेवाणीसाठी एक व्यासपीठ प्रदान करण्यासाठी तयार केले जाईल. वर्गातील प्रक्रिया सुधारण्यासाठी, शिक्षकांच्या व्यावसायिक विकासाला मदत करण्यासाठी, वंचित गटांसाठी शैक्षणिक प्रवेश वाढविण्यासाठी आणि शैक्षणिक नियोजन, प्रशासन आणि व्यवस्थापन सुव्यवस्थित करण्यासाठी तंत्रज्ञानाचे शिक्षणाच्या सर्व स्तरांमध्ये योग्य एकीकरण केले जाईल.

**१०. भारतीय भाषांचे संवर्धन**

सर्व भारतीय भाषांचे जतन, वाढ आणि जीवंतपणा सुनिश्चित करण्यसाठी, NEP 2022 ने भारतीय भाषांतर आणि व्याख्या संस्था (IITI), राष्ट्रीय संस्था (किंवा संस्था) पाली, पर्शियन आणि प्राकृत, संस्कृत आणि .... मध्ये सर्व भाषा विभागांना बळकट करण्यासाठी शिफारस केली आहे आणि अधिक HEI कार्यक्रमांमध्ये शिक्षणाचे माध्यम म्हणून मातृभाषा / स्थानिक भाषा वापरण्यात येईल.

शिक्षणाचे आंतरराष्ट्रीयीकरण दोन्ही संस्थात्मक सहकार्यांद्वारे आणि विद्यार्थी आणि प्राध्यापकांच्या गतिशीलतेद्वारे सुलभ केले जाईल, आणि जागतिक क्रमवारीतील सर्वोच्च विद्यापीठांना आपल्या देशात कॅम्पस उघडण्यासाठी प्रवेश दिला जाईल.

**११. व्यावसायिक शिक्षण**

सर्व व्यावसायिक शिक्षण उच्च शिक्षण प्रणालीचा अविभाज्य भाग असेल. स्टँड–अलोन टेक्निकल युनिव्हर्सिटी, हेल्थ सायन्स युनिव्हर्सिटी, विधी आणि कृषी युनिव्हर्सिटी इत्यादी बहु–विषय संस्था बनण्याचे उद्दिष्ट असेल.

व्यावसायिक तयारीमध्ये नैतिकतेचे शिक्षण आणि लोकांचे महत्त्व समाविष्ट करणे आवश्यक आहे. उद्देशासाठी शिक्षण, शिस्त आणि सरावासाठी शिक्षण. त्यातील मध्यवर्ती भाग गंभीर असणे आवश्यक आहे आणि अंत:विषय विचार, चर्चा,वादविवाद, संशोधन आणि नवकल्पना. हे साध्य करण्यासाठी, व्यावसायिक शिक्षण हे एखाद्याच्या विशिष्टतेला वेगळे ठेवून घेऊ नये. अशा प्रकारे व्यावसायिक शिक्षण हा एकूण उच्च शिक्षण व्यवस्थेचा अविभाज्य भाग बनतो. स्टँड–अलोन कृषी विद्यापीठे, कायदा विद्यापीठे, आरोग्य विज्ञान विद्यापीठे, तांत्रिक विद्यापीठे आणि इतर क्षेत्रातील स्वतंत्र संस्था, बहुविद्याशाखीय बनण्याचे उद्दिष्ट ठेवतील सर्वांगीण आणि बहुविद्याशाखीय शिक्षण देणाऱ्या संस्था. सर्व संस्था एकतर ऑफर करतात व्यावसायिक किंवा सामान्य शिक्षण संस्था / क्लस्टर ऑफरिंग नैसर्गिकरित्या विकसित करण्याचे उद्दिष्ट ठेवा.

**यश सरप**

बी.एस्सी. भाग–२

# तो थेंब पावसाचा....

कसं आभाळ दाटून आलं
मन वाऱ्यागत भिरभिरू लागलं
विज कडकडताच क्षणी मनाला
कसं गुळीत सांगून गेलं....
तो पहिला थेंब पावसाचा
हळूच स्पर्श करून गेला....
मातीत पडताच क्षणी
कसा सुगंध दरवळू लागला....

रानात दुर कुठेतरी एक
मधुर आवाज आला....
मोर नाचतो आहे फुलवून पिसारा
हळूच सांगून गेला....
त्याच्या फुललेल्या पिसाऱ्याला पाहून
मन बेधूंद झाले....
त्याला नाचताना पाहून
माझे मनही नाचू लागले....

**कु. जयश्री हाडोळे**

बी.एस्सी. भाग–१

# राष्ट्रीय शैक्षणिक धोरण

शालेय आणि उच्च शिक्षणात मोठ्या प्रमाणात परिवर्तनात्मक सुधारणांना यात मोठा वाव देण्यात आला आहे. २१व्या शतकातले हे पहिले धोरण असून ३४ वर्ष जुन्या १९८६ च्या शिक्षणावरच्या राष्ट्रीय धोरणाची जागा नवे धोरण घेणार आहे. सर्वांना संधी, नि:पक्षपात, दर्जा, परवडणारे आणि उत्तरदायित्व या स्तंभावर याची उभारणी करण्यात आली आहे. २०३० च्या शाश्वत विकास कार्यक्रमाशी याची सांगड घालण्यात आली आहे. शालेय आणि महाविद्यालयीन शिक्षण अधिक समग्र, बहू शाखीय, २१ व्या शतकाच्या गरजांना अनुरूप करत भारताचे चैतन्यशील प्रजावंत समाज आणि जागतिक ज्ञान महासत्ता म्हणून परिवर्तन घडवण्याचा आणि प्रत्येक विद्यार्थ्यांच्या आगळ्या क्षमता पुढे आणण्याचा या धोरणाचा उद्देश आहे.

**महत्वाचे मुद्दे :**

**शालेय शिक्षण**

शालेय शिक्षणाच्या सर्व स्तरावर सार्वत्रिक प्रवेश संधी सुनिश्चित करत राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० मध्ये शालेय पूर्व ते माध्यमिक अशा सर्व स्तरावर शालेय शिक्षणाला सार्वत्रिक संधी सुनिश्चित करण्यावर भर देण्यात आला आहे. पायाभूत सुविधा सहाय्य, शाळाबाह्य मुलांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी कल्पक शिक्षण केंद्रे, विद्यार्थी आणि त्यांच्या अध्ययन स्तराचा मागोवा, औपचारिक आणि अनौपचारिक शिक्षण पद्धतींसह शिक्षणाचे अनेक मार्ग सुलभ करणे, शाळांसमवेत समुपदेशाक किंवा उत्तम प्रशिक्षित सामाजिक कार्यकर्त्यांची सांगड, एनआयओएस आणि राज्यातल्या मुक्त शाळा याद्वारे ३, ५ आणि ८ व्या इयत्तेसाठी खुले शिक्षण, व्यावसायिक अभ्यासक्रम, प्रौढ साक्षरता आणि जीवन समृद्ध करणारे कार्यक्रम या मार्गाने हे उद्दिष्ट साध्य करण्यात येणार आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० अंतर्गत सुमारे २ कोटी शाळाबाह्य मुले मुख्य प्रवाहात आणली जाणार आहेत.

**नवा अभ्यासक्रम आणि शैक्षणिक आराखड्यासह बालवयाच्या सुरवातीलाच काळजी आणि शिक्षण**

बालवयाच्या सुरवातीलाच काळजी आणि शिक्षण यावर भर देत १०+२ या शालेय अभ्यासक्रम आकृती बंधाची जागा आता ५+३+३+४ अभ्यासक्रम आराखडा अनुक्रमे ३–८, ८–११, ११–१४, १४–१८ वयोगटातील राहील. यामुळे ३–६ वर्ष हा आतापर्यंत समाविष्ट न झालेला वयोगट शालेय अभ्यासक्रमा अंतर्गत येईल. जगभरात हा वयोगट, बालकांच्या मानसिक जडणघडणीच्या विकासासाठी अतिशय महत्वाचा मानला जातो. नव्या पद्धतीत तीन वर्षे अंगणवाडी / शाळापूर्व वर्गांसह १२ वर्ष शाळा राहणार आहे. एनसीईआरटी, बालवयाच्या सुरवातीची काळजी आणि शिक्षण यासाठी ८ वर्षांपर्यंतच्या बालकांसाठी राष्ट्रीय अभ्यासक्रम आणि शैक्षणिक आराखडा विकसित करणार आहे. अंगणवाडी आणि पूर्व शालेय सह विस्तृत आणि बळकट संस्थांच्या माध्यमातून ई सी सी ई देण्यात येईल. ई सी सी ई अभ्यासक्रमात प्रशिक्षित शिक्षण आणि आंगणवाडी कार्यकर्ते यासाठी असतील मनुष्य बळ विकास, महिला आणि बाल विकास मंत्रालय, आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालय आणि आदिवासी विकास मंत्रालय ई सी सी ई नियोजन आणि अंमलबजावणी करणार आहे.

**पायाभूत साक्षरता आणि संख्या शिक्षण साध्य करणे**

पायाभूत साक्षरता आणि संख्या शिक्षण ही शिक्षणाची पूर्व अट आहे हे जाणून राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० मध्ये एम एच आर डी कडून पायाभूत साक्षरता आणि संख्याशिक्षण राष्ट्रीय मिशन स्थापन करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. सर्व प्राथमिक शाळेत सार्वत्रिक पायाभूत साक्षरता आणि संख्या शिक्षण साध्य करण्यासाठी राज्ये अंमलबजावणी आराखडा तयार करतील. देशात

राष्ट्रीय ग्रंथ प्रोत्साहन धोरण आखण्यात येईल.

**शालेय अभ्यासक्रम आणि शिकवण्याच्या पद्धतीत सुधारणा**

२१व्या शतकाची प्रमुख कौशल्ये, आवश्यक शिक्षण आणि चिकित्सात्मक विचार वाढवण्यासाठी अभ्यासक्रम कमी करणे आणि अनुभवातून शिक्षणावर अधिक लक्ष केंद्रित करून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास करणे हा शालेय अभ्यासक्रम आणि शिकवण्याच्या पद्धतीचा उद्देश असेल. विद्यार्थ्यांची लवचिकता आणि विषयांचे पर्याय वाढतील. कला आणि विज्ञान, अभ्यासक्रम आणि अवांतर उपक्रम, तसेच व्यावसायिक आणि शैक्षणिक शाखा यांच्यात कुठल्याही प्रकारचे कठोर विभाजन असणार नाही. शाळांमध्ये व्यावसायिक शिक्षण ६ वी पासून सुरु होईल आणि त्यात इंटर्नशिपचा समावेश असेल.

एनसीईआरटी द्वारे एक नवीन आणि सर्वसमावेशक राष्ट्रीय शालेय शिक्षण अभ्यासक्रम रूपरेषा – एनसीएफएसई २०२०–२१ विकसित केली जाईल.

**बहुभाषिकता आणि भाषेची ताकद**

या धोरणामध्ये किमान इयत्ता ५वी पर्यंत आणि प्राधान्याने ८वी आणि त्यानंतरही मातृभाषा / स्थानिक भाषा / प्रादेशिक भाषा हे शिकवण्याचे माध्यम असावे यावर भर देण्यात आला आहे. शालेय आणि उच्च शिक्षणाच्या सर्व स्तरांवर विद्यार्थ्यांना तीन भाषांच्या सूत्रासह संस्कृतचाही एक पर्याय दिला जाईल. भारतातील इतर अभिजात भाषा आणि साहित्य देखील पर्याय म्हणून उपलब्ध असतील. 'एक भारत श्रेष्ठ भारत' उपक्रमांतर्गत इयत्ता ६–८ साठी 'भारताच्या भाषा' विषयावरील मजेदार प्रकल्प / उपक्रमात विद्यार्थी सहभागी होतील. माध्यमिक स्तरावर विविध परदेशी भाषांचा पर्याय देखील दिला जाईल. दिव्यांग विद्यार्थ्यांकरिता वापरण्यासाठी भारतीय सांकेतिक भाषा (आयएसएल) संपूर्ण देशभरात प्रमाणित केली जाईल आणि राष्ट्रीय आणि राज्य अभ्यासक्रम सामुग्री विकसित केली जाईल. कुठल्याही विद्यार्थ्यांवर कोणतीही भाषा लादली जाणार नाही.

**मूल्यांकन सुधारणा**

एनईपी २०२० मध्ये सारांशात्मक मूल्यांकनाकडून नियमित आणि रचनात्मक मूल्यांकनाकडे वळण्याची कल्पना मांडली आहे जी अधिक योग्यता–आधारित आहे. शिक्षण आणि विकासाला उत्तेजन देणारी आहे आणि विश्लेषण, चिकित्सात्मक विचार प्रक्रिया आणि वैचारिक स्पष्टता या सारखी उच्च कौशल्ये तपासते. इयत्ता ३, ५ आणि ८ वी मध्ये सर्व विद्यार्थी परीक्षा देतील जी योग्य यंत्रणेद्वारे घेण्यात येईल. इयत्ता १० आणि १२ वी साठी शिक्षण मंडळाच्या (बोर्ड) परीक्षा सुरूच राहतील मात्र समग्र विकासाच्या उद्देशाने त्यांची पुर्नरचना केली जाईल. दर्जा निश्चिती संस्था म्हणून पारख (समग्र विकासासाठी कामगिरी मूल्यांकन, आढावा आणि ज्ञानाचे विश्लेषण) हे एक नवे राष्ट्रीय मूल्यांकन केंद्र स्थापन केले जाईल.

**न्याय्य आणि सर्वसमावेशक शिक्षण**

जन्माच्या वेळेची परिस्थिती किंवा अन्य पार्श्वभूमीमुळे कोणताही मुलगा शिकण्याची आणि उत्कृष्टतेची संधी गमावणार नाही हे एनईपी २०२० चे उद्दिष्ट आहे. लिंग, सामाजिक–सांस्कृतिक आणि भौगोलिक ओळख आणि अपंगत्व समाविष्ट असलेल्या सामाजिक आणि आर्थिकदृष्ट्या वंचित गटांवर (एसईडीजी) विशेष भर दिला जाईल. यामध्ये लिंग समावेश निधी आणि वंचित प्रदेश आणि गटांसाठी विशेष शैक्षणिक क्षेत्र स्थापन करण्याचा समावेश आहे. दिव्यांग मुले प्रशिक्षण, संसाधन केंद्रे, राहण्याची सुविधा, सहाय्यक उपकरणे, योग्य तंत्रज्ञान–आधारित साधने आणि त्यांच्या गरजांनुसार तयार करण्यात आलेल्या अन्य सहाय्यक साधनांच्या मदतीने पूर्व–प्रार्थमिक टप्प्यापासून उच्च शिक्षणापर्यंतच्या नियमित शालेय शिक्षण प्रक्रियेत पूर्णपणे भाग घेण्यास सक्षम

असतील. प्रत्येक राज्य / जिल्ह्यात कला-संबंधित, करिअरशी संबंधित आणि खेळाशी संबंधित उपक्रमांमध्ये भाग घेण्यासाठी एक खास डे-टाइम बोर्डिंग स्कूल म्हणून ''बाल भवन्स'' स्थापन करायला प्रोत्साहन दिले जाईल. सामाजिक चेतना केंद्रे म्हणून मोफत शालेय पायाभूत वापरता येतील.

**मजबूत शिक्षक भरती आणि करिअर मार्ग**

शिक्षकांची भरती सक्षम पारदर्शक प्रक्रियेद्वारे केली जाईल. बढती गुणवत्तेवर आधारित असेल ज्यामध्ये बहु-स्त्रोत नियमित कामगिरी मूल्यांकन आणि उपलब्ध प्रगतीचे मार्ग याद्वारे शैक्षणिक प्रशासन किंवा शिक्षक होता येईल. एनसीईआरटी, एससीईआरटी, शिक्षक आणि विविध पातळी व प्रदेशातील तज्ज्ञ संघटना यांच्याशी विचारविनिमय करून राष्ट्रीय शिक्षक शिक्षण परिषद २०२२ पर्यंत शिक्षकांसाठी राष्ट्रीय व्यावसायिक मानके (एनपीएसटी) विकसित करेल.

**शालेय प्रशासन**

शाळा संकुले किंवा समूहांमध्ये आयोजित केल्या जाऊ शकतात जे प्रशासनाचे मुलभूत घटक असतील आणि पायाभूत सुविधा, शैक्षणिक ग्रंथालये आणि बळकट व्यावसायिक शिक्षक समुदायासह सर्व संसाधनांची उपलब्धता सुनिश्चित करेल.

**शालेय शिक्षणासाठी मानक-निश्चिती आणि मान्यता**

एनईपी २०२० मध्ये धोरण आखणी, नियमन, संचलन आणि शैक्षणिक बाबींसाठी स्पष्ट, स्वतंत्र यंत्रणेची कल्पना केली आहे. राज्ये / केंद्रशासित प्रदेश स्वतंत्र राज्य शालेय मानक प्राधिकरण (एसएसएसए) स्थापन करतील. एसएसएसएनने ठरवलेल्या सर्व मुलभूत नियामक माहितीचे पारदर्शक सार्वजनिक स्वयं-प्रकटीकरण सार्वजनिक प्रतिष्ठा आणि दायित्वासाठी प्रामुख्याने वापरले जाईल. एससीईआरटी सर्व हितधारकांशी सल्लामसलत करून शालेय गुणवत्ता मूल्यांकन आणि मान्यता रूपरेषा (एसक्यूएएफ) विकसित करेल.

**उच्च शिक्षण**

**२०३५ पर्यंत जीईआर ५० टक्क्यांपर्यंत वाढवणे**

व्यावसायिक शिक्षणासह उच्च शिक्षणामध्ये सकल नोंदणी गुणोत्तर २६.३ टक्के (२०१८) वरून २०३५ साला पर्यंत ५० टक्के पर्यंत वाढवण्याचे एनईपी २०२० चे उद्दिष्ट आहे. उच्च शिक्षण संस्थांमध्ये ३.५ कोटी नवीन जागा वाढवण्यात येतील.

**समग्र बहु शाखीय शिक्षण**

